

नवा मराठा

संपादक : सुभाष गुंदेचा — व्यवस्थापक : अनिकेत गुंदेचा

रजि नं. ११४३९-५७/३७ पाने ८ किंमत ३ रूपये अहिल्यानगर, शुक्रवार दि. ०६.११.२०२६ अंक नं. १८५ वर्ष ६९ वे दैनिक वर्ष ६३ वे ANR/022/2018-2020

₹11 लाखांची 1111 बक्षिसे जिंकण्याची संधी...

विश्वसनीय कापडांची अखंड परंपरा

राजपाल

राजपाल खरेदी करा आणि जिंका 41 दिवस 11 लाखांचे बक्षिसे 11 ऑक्टोबर - 20 नोव्हेंबर

संगमनेर 02425-222226 | अ.नगर 0241-2999299 | नारायणगाव 02132-242132 | श्रीरामपूर 02422-220090 | नाशिक 9920552780

SONI TILES Since 1965
AND MARBLE INDUSTRIES
Opp. Munot Estate, Station Road, Ahmednagar. Tel. : (0241) 2418720
Mob. 9372497999
Wholesalers & Manufacturers of - Ceramic Wall & Floor Tiles, Vitrified Tiles, Paving Blocks, Marble & Granite
सोनी टाईल्स ॲण्ड मार्बल इंडस्ट्रिज

लोकेश मार्केटिंग 9766045549

चोखंदळ विक्रेत्यांसाठी व ग्राहकांसाठी
आहेर घर
१८+१८+१८=५४ प्रकार
दिवाळी कार्तीक मास लग्नसराई, गिफ्ट पॅक अनुभव हिच खात्री
एक वेळ अवश्य भेट द्या

लक्ष्मण एजन्सीज 9890963100

PURE EV
अहिल्यानगर व छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यासाठी डीलरशिप देणे आहे
GO.. PURE GO.. GREEN

तुमची आवडती ई ही बाईक खरेदी करा आणि मिळवा आकर्षक बक्षीस



गाडीच्या EX शोरूम प्राईजवर 5% ते 8% पर्यंत डिस्काउंट

प्रत्येक गाडी खरेदीवर एक हमखास गिफ्ट कुपन



इलेक्ट्रिक वाहनांचे नवे युग यासाठी आजचं भेट द्या

श्री. सिमरन सुभाष विखोना 9767119099 / 7387419999
सौ. प्रिती सिमरन विखोना 8668854061 / 7389389393

पत्ता - साई श्याम पि.वि. गांधी विकास फर्निचर शेजारी नेवासा- नेवासा फाटा रोड

धनत्रयोदशी
सुवर्णखरेदीचा सुवर्णयोग..

वेढणी व क्वाईनच्या रूपानं शुध्द सोनं खरेदी करा.



0.5gm / 1gm / 2gm / 5gm / 10gm / 15gm / 20gm / 25gm / 50gm
99.50 शुध्दतेमधील प्रत्येक वजनामध्ये वेढणी व क्वाईन उपलब्ध



गणपती, लक्ष्मी, रामदरबार, अन्नपुर्णा यांच्या चांदीच्या सर्व वजनामधील भरीव व पोकळ मुर्ती व पुजेचे साहित्य उपलब्ध.

यंदाची सुवर्णखरेदी दिवाळी धमाका ऑफर भरघोस फायद्याची..

₹999/- प्रतीग्रॅम मजुरी (22 कॅरेट सर्व दागिन्यांची) + ₹111/- चांदी चक्क फ्री (प्रतीग्रॅम सोने खरेदीवर)



सोनेखरेदीवर लकी ड्रॉ कुपनव्दारे 11 एलईडी टिव्ही (43") जिंकण्याची सुसंधी*
(प्रती एक ग्रॅम एक लकी कुपन.)

ऑफर कालावधी – 11 ऑक्टोबर 2026 ते 30 डिसेंबर 2026 पर्यंत वैध

शुध्दतेनुसार सोन्याचा दर 22 कॅरेट = (91.6 शुध्दता) | शुध्दतेनुसार चांदीचा दर

चंदुकाका ज्वेल्स™
शॉप नंबर 2/3, साई मिडास टच, नगर-मनमाड रोड, सावेडी, अहिल्यानगर 9272422001/02



2014 पासुन आपल्या सेवेत.. सोनेरी नातं..

Conditions Apply*

दिवाळी धमाका ऑफर

मजुरी शानदार, ऑफर धमाकेदार..
आमचा प्रत्येक ग्राहक, लकी ग्राहक..



सर्व दागिन्यांची प्रतिग्रॅम मजुरी ₹701/-* पासून

डबल शाईन योजना
10 महिने हप्ते भरा व 11 व्या महिन्यात सुवर्णखरेदी करतांना दर वाढले तरी फायदा तुमचाच!
सोन्याचे दर आजच निश्चित करा
मजुरीवर मिळवा 50% सूट

सुवर्णसंचय योजना
12=13
12 महिने हप्ते भरा व 13वा हप्ता आमच्याकडुन मिळवा व खरेदी करा शुध्द सोने (वेढणी / क्वाईन) किंवा नाविण्यपुर्ण अलंकार.

सोने खरेदीवर हाँगकाँग ट्रिप जिंकण्याची संधी

ऑफर 11 ऑक्टोबर 2026 ते 15 नोव्हेंबर 2026


नियम व अटी लागू* ही योजना आमच्या अहिल्यानगर / श्रीरामपुर / कडा या तिनही शोरूममध्ये चालु आहे.

शुध्दता, विश्वासार्हता, पारदर्शकता
चंदुकाका ज्वेलर्स

वसंत टॉकिज रोड, अहिल्यानगर 0241-2321512 | बेलापुर रोड, श्रीरामपुर 02422-221512 | धामणगांव रोड, कडा 02441-239538

आमच्याकडे खरेदी केलेल्या सोने-चांदीच्या दागिन्यांची मोडतेवेळी घट धरली जात नाही.

यंदाची दिवाळी
सौंदर्याने नटलेली तन-मनाने सजलेली...









आपणा सर्वांच्या प्रेमळ प्रतिसादाच्या पाठबळावर
महाराष्ट्रात प्रथमच
४००० स्के.फुटाचे सर्वोत्तम, प्रशस्त, वातानुकूलीत असे सौंदर्यप्रसाधनाचे एकमेव दालन..

सर्व नामांकित कंपन्यांच्या ब्रॅण्डेड सौंदर्य प्रसाधनासाठी महिला वर्गाचे आवडते एकमेव दालन

महावीर कॉस्मेटिक्स्
मोची गल्ली, अहिल्यानगर.

बायड परिवारातर्फे दिवाळीच्या आनंदी आणि सौंदर्यदायी शुभेच्छा !

Dishan

जिल्ह्यातील निकडीच्या प्रश्नांना वाचा फोडणारे एकमेव दैनिक

संस्थापक कै. आचार्य गुंदेचा

नवा मराठा

फोन–२४१४१४१, २४१७७७७

भाडोत्री म्हणून वर्षानुवर्ष जगण्यापेक्षा निर्भिड म्हणून क्षणभर जगण्यात जीवनाचे खरे सार्थक आहे. – कै.आचार्य गुंदेचा

email - navamaratha@gmail.com



शहराच्या मध्यवस्तीत दिसलेला इंडियन पिट्टा (नवरंग) पक्षी. छायाचित्र मंदार साबळे

अहिल्यानगरमध्ये आढळले इंडियन पिट्टा (नवरंग) पक्षी

नगर – सध्या पक्षी सप्ताह सुरु असुन याच कालावधीत दुर्मिळ असणारा इंडियन पिट्टा (नवरंग) या छोट्या आकाराचा पक्षी शहराच्या भरवस्तीत तसेच सावेडी उपनगरात दिसल्याने अहिल्यानगर शहरातील पक्षांची जैव विविधता समोर आली आहे. बुधवारी हा पक्षी तोफखाना भागातील ठाकूर गल्ली भागात खाली जमिनीवर पडलेला दिसल्यावर तेथील रहिवासी अभिजित कांबळे यांनी त्यास उचलून घेत याबाबत पक्षी निसर्गमित्र मंदार साबळे यांना कळवले. साबळे यांनी त्यास तेथुन आणून त्याला दुसरीकडे निसर्गात मुक्त केले. या पक्षाची दुसरी नोंद पाईपलाईन रस्त्यावरील विद्या कॉलनीत झाली. तेथे राहणारे पक्षी अभ्यासक प्रा.डॉ सुधाकर कुऱ्हाडे यांना त्यांच्या परसबागेत हा पक्षी दिसला. या पक्षाला त्याच्या अंगावर दिसणाऱ्या विविध रंगांमुळे नवरंग असे नाव पडले असुन हा भारतातील सर्वात आकर्षक पक्ष्यांपैकी एक आहे. त्याचा आकार साधारण १६–१८ सेंमी असतो. महाराष्ट्रासह भारतातील अनेक राज्यांत हा आढळतो. जंगल, बागा आणि दाट झुडपांच्या परिसरात याचा वावर असतो.

विशेषतः जमिनीवर पालापाचोळ्यात अन्न शोधताना हा अनेकदा नजरेस पडतो. मुंग्या, वाळवी, लहान कीटक, अळ्या, गांडुळे तसेच जमिनीवरील लहान अपृष्ठवंशी प्राणी हे खाऊन हा आपली गुजरान करतो. हा भारतात अंतर्गत स्थलांतर करणारा पक्षी आहे. हिवाळ्यात तो दक्षिण भारताकडे स्थलांतर करतो. यामुळे स्थलांतर करताना हा सध्या नगर परिसरात मध्ये दिसला असण्याची शक्यता आहे. हा पक्षी नगर मध्ये दिसल्याची ही चौथी नोंद असल्याचे डॉ. कुऱ्हाडे व साबळे यांनी सांगितले. सावेडीतील हा नवरंग उडत तोफखाना भागात आला असावा अशी शक्यता त्यांनी व्यक्त केली.

जिल्हा बँक : अध्यक्ष शंकर गडाख की मोनिका राजळे : फिरोदिया महात्म्ये : शिंदे आडनावांचे 'राजकीय गारुड'

अहमदनगर जिल्हा बँकेची बहुचर्चित ठरलेली संचालक मंडळाची निवडणूक अखेर निर्विघ्न पार पडली. अपेक्षेप्रमाणे थोरात– विखे पॅनलने निर्विवाद बहुमत पटकावले. आता औत्सुक्य आहे, अध्यक्ष–उपाध्यक्ष कोण होणार ? यावरही दिवाळीनंतर शिकामोर्तब होईल. अध्यक्षपदासाठी तूर्तातूर्त तरी शंकरराव गडाख आणि आमदार मोनिका राजळे यांची नावे आघाडीवर आहेत. माजीमंत्री आणि काँग्रेसचे नेते बाळासाहेब थोरात यांना मानणाऱ्या संचालकांची संख्या सर्वाधिक दिसते. त्यांच्याच मर्जीने अध्यक्षपदाचा निर्णय होणार असेल तर शंकरराव गडाख यांची वर्णी लागू शकते, पण माजी खासदार डॉ. सुजय विखे यांनी धक्कादायक नाव पुढे येऊ शकते, ती व्यक्ती मुख्यमंत्री फडणवीस यांच्या पसंदीची असेल असा तर्क व्यक्त केला आहे. मुख्यमंत्री फडणवीसांच्या संमतीने नाव निश्चित करताना बाळासाहेब थोरात यांचा कल लक्षात घ्यावा लागेल. फडणवीस–थोरात यांच्या पसंदीचे एकमत हे आमदार राजळे यांच्यावर होऊ शकते, त्या भाजपच्या नेत्या आहेत, तसे थोरात आणि गडाख यांच्या नातेवाईक आहेत, त्यामुळे आ.मोनिका राजळे यांच्या गळ्यात अध्यक्षपदाची माळ पडली तर कोणी आश्चर्य मानू नये. त्यातून महिलेला अध्यक्षपदाची संधी दिल्याचे राजकीय पुण्य भाजपाच्या पदरात पडेल, हा राजकीय प्रचारासाठी भाजपला राज्यात हा मुद्दा उचलता येईल. त्याचबरोबर ज्या जिल्हा बँकेच्या बायलॉजमध्ये महिलांना मज्जाव करण्याचा मुद्दा पूर्वी ठळकपणे नमूद केला होता, तो कालबाह्य ठरेल याचे श्रेय भाजपला मिळू शकते. बँकेच्या इतिहासात यावेळी पहिल्यांदाच सहा महिला संचालक झाल्या आहेत.

शिंदे आडनावाचे गारुड

जिल्हा बँकेच्या या निवडणुकीची अनेक वैशिष्टे आहेत की जी यापूर्वी कधीच चर्चेत आली नव्हती. त्याचा मागोवा घ्यावा लागेल. यापूर्वी दैनिक नवा मराठाच्या अंकात निवडणूकपूर्व तीन भागात घेतला आहेच. आता संचालक मंडळाच्या पहिल्या बैठकीत जिल्हा बँकेचे नामांतर 'अहमदनगर' ऐवजी 'अहिल्यानगर जिल्हा बँक' असे अधिकृतरित्या करावे लागेल. पूर्वीचे हे नामांतर प्रशासकीय पातळीवर झाले होते, ते लोकनियुक्त संचालकाच्या संमतीने व्हावे लागेल. ज्या जिल्हा बँकेचे नामांतर अधिकृत होणार ती निवडणूक त्यांच्या घराण्याचे वंशज प्रा.राम शिंदे यांच्या नावाभोवतीच केंद्रित झाली होती. ते संचालक होऊ शकले नाहीत, खरे तर त्यांची तीन अपत्याच्या मुद्द्यामुळे फसगत झाली, त्याला आमदार रोहित पवार यांनी राजकीय हवा दिली. वास्तविक हा मुद्दा कायद्याच्या निकषावर अजिबात टिकला नसता. तीन अपत्याचा मुद्दा कालबाह्य ठरत असल्याचे सुप्रिम कोर्टाने ठळकपणे निर्देशित केले आहे. त्या पेक्षा जिल्हा बँक ही 'स्वायत्त' संस्था आहे असे यापूर्वी जिल्हा बँकेच्या १९९१ च्या नोकरभरती प्रकरणांत हायकोर्टाने स्पष्टपणे नमूद केलेले आहे. बँकेच्या बायलॉजमध्ये तीन अपत्याचा कोणालाच मज्जाव नाही, तो नियम स्थानिक स्वराज्य संस्थेसाठी आहे. जिल्हा बँकेसाठी नाही, बँकासाठी दहा वर्षांच्या संचालक पदाबाबत आहे, अपत्यांच्या संदर्भात नाही, परंतु प्रा. राम शिंदे हे विधान







परिषदेचे सभापती असल्याने या पदाची आब राखण्यासाठी उमेदवारीपासून ऐनवेळी दूर राहण्याचा त्यांनी निर्णय घेतला अन्यथा बँक निवडणुकीचे चित्र यावेळी वेगळे असते. अर्थात हा आता जर तरचा भाग झाला, तरी त्यांच्या पॅनलचे दोन उमेदवार संचालक झालेत. प्रा.राम शिंदे उमेदवार नव्हते तरी बँकेचे राजकारण शिंदे आडनांवाभोवतीच केंद्रित झाले होते. खा. लंकेच्या विरोधात पारनेरमध्ये राहुल शिंदे यांनी शड्डू ठोकला होता. बँकेत त्यांचीच निवडणूक हाय होल्टेज ठरली, भलेही खा. लंके विजयी झाले पण चर्चा राहुल शिंदे यांची झडली. अकोल्यात संजीवनी शिंदे प्रस्तापित पॅनलच्या विरोधात अपक्ष निवडून आल्या तसेच ज्योती शिंदे या राम शिंदेच्या पॅनलमधून निवडून आल्या. त्यांनी थोरात–विखे पॅनलचे पिसाळ यांना पराभूत केले. शिंदे अडनावाचे वेगळे गारुड बँकेच्या प्रचारात पहिल्यांदाच निर्माण झाले होते.

मोतीभाऊ फिरोदिया महात्म्ये

जिल्हा बँकेची स्थापना कोणत्या पार्श्वभूमीवर कोणी पुढाकार घेतला याचा इतिहास नवीन पिढीला फारसा ज्ञात नव्हता. तो यावेळी काही प्रमाणात ठळकपणे चर्चेत आल्याने किमान माहित झाला. बँकेची स्थापना मोतीभाऊ फिरोदिया, रोहमारे, विखे, भारदे यांनी पुढाकार घेऊन केली. मोतीभाऊ फिरोदिया यांनी अर्बन बँकेत कशी मिटींग घेतली, माणिक चौकातील देवी वाडा की कुकडे वाडा येथे बँक सुरु केली. धारप पहिले एमडी होते. त्यानंतर जी. के. पाटील यांनी प्रदीर्घकाळ प्रशासकीय धुरा सांभाळली. मोतीभाऊ सुमारे ३५ वर्षे संचालक होते. त्यांनी बँक स्थापनेसाठी वैयक्तिक सभासद केले. बँकेच्या संचालक मंडळात यापूर्वी तो मतदार संघ होता त्यातून मोतीभाऊ फिरोदिया सातत्याने निवडून येत. त्याच्यानंतर हेमराज पेमराज बोरा हे पाच वर्षे संचालक होते. नवीन नियमामुळे हा मतदारसंघ सध्या नाही. मोतीभाऊ फिरोदिया यांचे बँक कारभारातील स्थान मोठे होते, हे महात्म्ये कोणाला नाकारता येणार नाही. त्यांनीच बँकींग क्षेत्राच्या बाहेर जाऊन बँक सभासदांसाठी 'सहकारशक्ती' नांवाचे साप्ताहिक सुरु केले, त्याचे संपादक हे बँकेचे चेअरमन असायचे. वार्षिक ताळेबंद, सभासदांना बँकेच्या योजनांची माहिती त्याद्वारे पोहचवली जायची. नगर जिल्हा बँक राज्यातील एकमेव बँक होती की साप्ताहिक चालवत होती. बँकेतील दातरंगे त्यानंतर अनिल पाटील, भारत पाटील, सोले यांनी सहकार शक्तीचे काम पाहिले. ते बँकेचे कर्मचारी होते. पुढे सहकार शक्ती हे साप्ताहिक बंद करण्यात आले. या संचालक मंडळाने हे साप्ताहिक पुन्हा सुरू करण्याचा निर्णय घेतला तर तो लाभदायक ठरु शकतो.

बँकेचे महिला धोरण

विद्यमान संचालक मंडळात सहा महिलांचा समावेश आहे. कदाचित महिलाच अध्यक्ष अथवा उपाध्यक्ष होऊ शकतात, या बँकेत महिला धोरण यापूर्वी फारसे पुरोगामी नव्हते. महिलांना बँकेत शक्यतो नोकरीवर घेतले जात नव्हते. कदाचित त्यांच्या बायलॉजमध्ये तशी तरतूद असावी. स्टेशन रोडला बँक स्थलांतरीत झाल्यानंतर एक महिला टेलिफोन ऑपरेटर म्हणून घेतली होती. त्यानंतर माजी स्वातंत्र्यसैनिक मिसाळ यांची सून सौ. मिसाळ यांना पहिल्यांदा लिपिक म्हणून नोकरी लागली. त्यानंतर हळूहळू महिला धोरण शासनाच्या नियमावलीमुळे बदलावे लागले. आता बँक प्रशासनामध्ये महिलांची संख्या मोठी झाली. हा आमूलाग्र बदल मानावा लागेल. महिला बँकेच्या प्रशासनात नव्हत्या. तशा त्या बँक निवडणुकीतही नव्हता. बँक संचालक मंडळाची निवडणूक लढवण्याची पहिली सुरुवात पाथर्डीतून झाली. माणिकताई गर्जे या सुमारे २५ वर्षांपूर्वी संचालक मंडळाच्या निवडणुकीत उमेदवार होत्या. विशेष म्हणजे त्याच मतदारसंघात यावेळी आ.मोनिकाताई राजळे संचालक झाल्या. कदाचित त्या बँकेच्या अध्यक्षा होऊन वेगळा इतिहास घडवतील. बँकेच्या निवडणुकीची अशी एक ना अनेक वैशिष्ट्ये ठरू शकतात. जिल्हा बँकेच्या अध्यक्ष पदाच्या स्पर्धेत शंकरराव गडाख, आ.मोनिकाताई राजळे यांचे नाव चर्चेत आहे. तसेच गडाख चेअरमन झाले तर संगीता वाघ यांचे नाव व्हा. चेअरमनसाठी पुढे येऊ शकते. संगीता वाघ यांच्या बरोबर ११ उपाध्यक्षपदाच्या स्पर्धेत अनुराधा नागवडेंचे नाव असू शकते. हा जर–तरचा भाग झाला. जिल्हा बँकेतील राजकारणाची कुस बदलत असली तरी नात्या–गोत्याचा प्रभाव पूर्वी इतकाच कायम राहणार आहे. विखे म्हणतात तसे मुख्यमंत्र्याच्या संमतीने पदाधिकारी निवडले गेले तरी बाळासाहेब थोरात यांचाच शब्द अंतिम राहिल. कारण गोकूळ (कोल्हापूर) च्या राजकारणाचा धडा मुख्यमंत्री घेणार त्यामुळे काँग्रेस नेते थोरात यांना डावलले जाणार नाही तर त्यांचाच शब्द अंतिम राहील असाच रागरंग दिसतो.

– रामदास ढमाले (ज्येष्ठ पत्रकार) मोबा. ८९९९८१०००३

अहिल्यानगर जिल्हा सहकारी बँकेचे नवे कारभारी १२ नोव्हेंबरला ठरणार

नगर – जिल्हा सहकारी बँकेच्या अध्यक्ष व उपाध्यक्ष निवडीसाठी येत्या १२ नोव्हेंबर रोजी संचालक मंडळाची विशेष सभा बोलावण्यात येणार आहे. ११ नोव्हेंबरला भाऊबीज झाल्यानंतर लगेच दुसऱ्या दिवशी या निवडी होणार आहेत. जिल्हा बँकेच्यावतीने या विशेष सभेच्या अधिसूचनेचे नियोजन करण्यात आले असून या विशेष सभेच्या अध्यक्षस्थानी बँकेचे निवडणूक निर्णय अधिकारी तथा जिल्हा उपनिबंधक मंगेश सुरवसे हे राहणार आहेत.

जिल्हा सहकारी बँकेवर पालकमंत्री राधाकृष्ण विखे, माजी मंत्री बाळासाहेब थोरात आणि शंकरराव गडाख यांच्या सहकार विकास पॅनलने २१ पैकी १८ जागा मिळवित सत्ता मिळविली आहे. त्यामुळे आता सहकार विकास पॅनलकडून बँकेचा भावी अध्यक्ष आणि उपाध्यक्ष कोण होणार, याकडे जिल्ह्याचे लक्ष लागले आहे. निकालानंतर अध्यक्षपदासाठी लॉबिंग सुरू झाल्याचे सांगण्यात येत असले, तरी बिनविरोध निवडणुकीच्या चर्चेदरम्यानच अध्यक्ष व उपाध्यक्षपदाचा उमेदवार आणि बँकेचे नवे कारभारी निश्चित करण्यात आल्याची चर्चा आहे.

दरम्यान, जिल्हा बँकेच्या संचालक मंडळाच्या निवडणुकीचा निकाल जाहीर झाल्यानंतर आता अध्यक्ष आणि उपाध्यक्षपदाच्या निवडीसाठी अधिसूचना काढण्यात येणार आहे. या अधिसूचनेनुसार संचालक मंडळाची विशेष सभा बोलावण्यात येईल. या सभेत अध्यक्ष आणि उपाध्यक्षपदासाठी एकमत न झाल्यास मतदान प्रक्रिया राबविण्यात येणार आहे. जिल्हा बँकेच्या निकालानंतर आता पुढील अध्यक्ष कोण होणार, याबाबत राजकीय वर्तुळात चर्चा सुरू झाली आहे. अध्यक्षपदासाठी विखे गटाकडून कोणाचे नाव पुढे येणार? थोरात गटाला उपाध्यक्षपद मिळणार का? की विखे आणि थोरात गटाला मान्य असलेल्या एखाद्या नावावर एकमत होणार? तसेच बँकेच्या अध्यक्षपदी महिलेला संधी मिळणार का? असे अनेक प्रश्न उपस्थित होत आहेत.

मंत्री राधाकृष्ण विखे पाटील घेणार सभापती राम शिंदे यांची चौंडीत भेट

जिल्हा बँकेच्या अध्यक्ष–उपाध्यक्षपदाच्या निवडीच्या पार्श्वभूमीवर राजकीय घडामोंडीचे फटाके ऐन दिवाळीत फुटू लागले आहेत. विधानपरिषदेचे सभापती प्रा. राम शिंदे यांनी ५ नोव्हेंबर रोजी मुख्यमंत्री देवेंद्र फ डणवीस यांची नागपूर येथे भेट घेत जिल्हा बँकेच्या पदाधिकारी निवडीवर चर्चा केली होती. तर, लगेचच आज, ६ नोव्हेंबर रोजी दुपारी जलसंपदा तथा पालकमंत्री राधाकृष्ण विखे हे चौंडी,ता. जामखेड येथे प्रा. शिंदे यांची त्यांच्या निवासस्थानी भेट घेणार आहेत. ही भेट जिल्हा बँकेच्या पदाधिकारी निवडीसंदर्भात असल्याचे राजकीय वर्तुळात बोलले जात आहे.


जिल्हा बँकेच्या बिनविरोध निवडीच्या प्रक्रियेत थोरात–विखे–गडाख गटाने शिंदे यांना फारसे महत्त्व दिल्याचे दिसून आले नाही. त्यामुळे शिंदे यांनी या निवडणुकीत चार उमेदवार रिंगणात उतरवले होते. त्यातील जामखेड सेवा सोसायटी मतदारसंघातील त्यांचे समर्थक सचिन घुमरे यांची बिनविरोध निवड झाली, तर कर्जत सेवा सोसायटी मतदारसंघातून त्यांच्या सम थक ज्योती शिंदे या निवडून आल्या. महिला राखीव मतदारसंघातून अर्ज दाखल केलेल्या मनिषा गुंड व ओबीसी राखीव मतदारसंघातून अजिनाथ हजारे या शिंदे समर्थकांनी नंतर निवडणुकीच्या रिंगणातून माघार घेतली होती. शिंदे यांचे आता दोन संचालक जिल्हा बँकेत आहेत. त्यामुळे त्यांच्या शब्दाला महत्त्व आले आहे. त्यातच डॉ. सुजय विखे यांनी अध्यक्षपदाचा निर्णय मुख्यमंत्री घेतील असे सूतोवाच केल्याने व शिंदे यांनी मुख्यमंत्र्यांची भेट घेतल्याने विखे–शिंदे यांच्या भेटीला विशेष महत्त्व आले आहे.

अध्यक्षपदाचा चेंडू मुख्यमंत्र्यांच्या कोर्टात

निवडीनंतर डॉ. सुजय विखे यांनी जिल्हा बँकेचा अध्यक्ष–उपाध्यक्ष मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हे ठरवतील असे सूतोवाच केल्यामुळे मुख्यमंत्री कुणाच्या नावाला हिरवा कंदील दाखविणार याकडे सर्वांचे लक्ष लागून आहे. विखे गटाला अध्यक्षपद देण्याचा निर्णय झाल्यास थोरात–गडाख गट नाराज होऊ शकतात व या गटाकडे असणारे बहुमत बघता विखे हे धाडस सहजासहजी करणार नाहीत. त्यामुळे थोरातांच्या गटात असणारा पण भाजपा पक्षात असणारा अध्यक्ष निवडला जाण्याची शक्यता जास्त वर्तविली जात आहे.

शहरातील काँक्रिटचे रस्ते व नवीन गटारींच्या कामांचे प्रस्ताव थांबवले

पाणीटंचाईच्या पार्श्वभूमीवर अहिल्यानगर महापालिकेचा घेतला निर्णय




नगर – पाणीटंचाईच्या गंभीर पार्श्वभूमीवर महापालिकेने एक मोठा निर्णय घेतला असून, शहरातील काँक्रिटचे रस्ते आणि नवीन गटारींच्या कामांचे प्रस्ताव तूर्तास थांबवले आहेत. काँक्रिटकरणाच्या कामांसाठी मोठ्या प्रमाणावर पाण्याची आवश्यकता असते. शहरात निर्माण झालेली पाणीटंचाई लक्षात घेता, उपलब्ध पाण्याचा वापर केवळ नागरिकांना पिण्यासाठी आणि घरगुती वापरासाठी प्राधान्याने व्हावा, या उद्देशाने महापालिका प्रशासनाने हा पाऊल उचलले आहे.

अल निनोच्या प्रभावामुळे निर्माण झालेल्या दुष्काळी परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर पाणीटंचाईचे संकट गडद होत आहे. त्यामुळे ज्या विकासकामांमध्ये पाण्याचा मोठ्या प्रमाणावर वापर होतो, अशा कामांना प्रशासकीय मान्यता न देण्याचे आदेश राज्य शासनाच्या नियोजन विभागाने दिले आहेत. या निर्णयामुळे प्रामुख्याने सिमेंट काँक्रीटचे रस्ते आणि सांडपाणी निचरा करण्यासाठी बांधण्यात येणार्या काँक्रीटच्या गटारींच्या कामांना ब्रेक लागला आहे. शासनाच्या या निर्देशामुळे अहिल्यानगर महानगरपालिकेने नवीन काँक्रिटचे रस्ते आणि काँक्रीट गटारींच्या कामांचे प्रस्ताव थांबवले आहेत.

सन २०२६–२७ या आर्थिक वर्षासाठी जिल्हा वार्षिक योजनेतून अहिल्यानगर महापालिकेला विकासकामांसाठी निधी उपलब्ध झाला आहे. नागरी दलितेतर वस्ती सुधार योजनेतून १३ कोटी, जिल्हास्तर नगरोत्थान योजनेतून २० कोटी आणि लोकशाहीर अण्णाभाऊ साठे नागरी वस्ती सुधार योजनेतून ५.९४ कोटी रूपये असा ३९ कोटींचा निधी महापालिकेला मंजूर झाला आहे. मात्र, शासनाच्या नव्या आदेशामुळे यापूर्वी मंजुरीसाठी पाठवण्यात आलेल्या प्रस्तावांना आता प्रशासकीय मान्यता देण्यात आलेली नाही. जिल्हा प्रशासनाने दिलेल्या सूचनेनुसार, महापालिकेला आता काँक्रीटीकरणाची कामे वगळून सुधारित प्रस्ताव ३० नोव्हेंबर पर्यंत नव्याने फेरसादर करावे लागणार आहेत.

काँक्रिट रस्त्यांच्या क्युरिंग (पाणी मारणे) साठी हजारो लिटर पाण्याची गरज असते, सध्याच्या परिस्थितीत ही उधळपट्टी थांबवणे आवश्यक आहे. उपलब्ध जलसाठा केवळ नागरिकांच्या पिण्याच्या पाण्यासाठी आरक्षित ठेवला जात आहे. नवीन विकासकामांचे आणि विशेषतः पाणी लागणाऱ्या बांधकामांचे प्रस्ताव पुढील आदेशापर्यंत पुढे ढकलण्यात आले आहेत.


श्रीमती आशाबाई दागडिया यांचे अल्प आजाराने निधन



रहिवासी श्रीमती आशाबाई रामबिलास दागडिया (वय ७५) यांचे ५ नोव्हेंबर रोजी अल्प आजाराने निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर नालेगाव अमरधाम येथे अंत्यसंस्कार करण्यात आले.

त्यांच्या मागे १ मुलगा, २ मुली, सुन, जावई, नातवंडे असा परिवार आहे. नंदकिशोर दागडिया यांच्या त्या मातोश्री होत.

बबन खडके यांचे अल्प आजाराने निधन



नगर – चिचोंडी पाटील येथील रहिवासी बबन रामभाऊ खडके (वय ५५) यांचे ६ नोव्हेंबर रोजी अल्प आजाराने निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर चिचोंडी पाटील अमरधाम येथे अंत्यसंस्कार करण्यात आले.

त्यांच्या मागे आई, भाऊ, पत्नी, ३ मुली, १ मुलगा, भावजय, पुतणे असा परिवार आहे.

मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक सुभाष चंदनमल गुंदेचा यांनी नवा मराठा मुद्रणालय, २७२३, गंजबाजार, अहिल्यानगर येथे हे पत्र छापून येथेच प्रसिद्ध केले.

अहिल्यानगर आरटीओ कार्यालयात अनागोंदी कारभार, अनधिकृत एजेंटशाही, चेक पॉईंटवरील बेकायदेशीर वसुली व रस्त्यावर धोकादायक ओव्हरलोड वाहतूक

दलालशाही, रोख वसुली व धोकादायक 'जुगाडू' वाहतुकीवर कडक कारवाई करावी



दलालशाही, रोख वसुली व धोकादायक 'जुगाडू' वाहतुकीवर कडक कारवाई करावी, या मागणीचे निवेदन वंचित बहुजन आघाडीच्या वतीने प्रादेशिक परिवहन अधिकारी सगरे यांना देण्यात आले.

नगर – अहिल्यानगर प्रादेशिक परिवहन कार्यालयात सुरू असलेला अनागोंदी कारभार, अनधिकृत एजेंटशाही, चेक पॉईंटवरील बेकायदेशीर वसुली आणि रस्त्यावरील धोकादायक 'जुगाडू' व ओव्हरलोड ऊस वाहतुकीविरोधात वंचित बहुजन आघाडीच्या वतीने प्रादेशिक परिवहन अधिकारी सगरे यांना निवेदन देताना जिल्हाध्यक्ष योगेश साठे, वाहतूक विभागाचे मनोज साळवे, युवा शहराध्यक्ष ॲड. योगेश गुंजाळ, गौतम निळ, मनोज साळवे, पप्पू चव्हाण, संदीप साळवे, सुरेश पानपाटील उपस्थित होते.

निवेदनात म्हटले आहे की, आरटीओ कार्यालयात कामासाठी येणाऱ्या नागरिकांना थेट सेवा मिळण्याऐवजी अनधिकृत मध्यस्थ व दलालांच्या माध्यमातून जाण्याची सक्ती केली जात असून, यामुळे सर्वसामान्यांची आर्थिक पिळवणूक होत आहे तसेच शासनाचे परिपत्रक असतानाही अधिकारी व कर्मचारी मुख्यालयात वेळेवर उपस्थित राहत नसल्याने नागरिकांना ताटकळत राहावे लागते. तसेच रस्ते तपासणी पथकांकडून चेकिंगच्या नावाखाली चेक पॉईंट्सवर वाहने अडवून बेकायदेशीररीत्या रोख वसुली केली जात असल्याच्या तक्रारी प्राप्त झाल्या आहेत. जिल्ह्यात कोणतीही सुरक्षा मानके न पाळता आणि अधिकृत पासिंग किंवा आरटीओ मान्यता नसताना सर्रास चालणारी बेकायदेशीर 'जुगाडू' आणि क्षमतेपेक्षा जास्त (ओव्हरलोड) ऊस वाहतूक अत्यंत चिंताजनक बनली आहे. यामुळे गंभीर अपघात होऊन निष्पाप नागरिकांचा जीव धोक्यात येत असूनही आरटीओ प्रशासनाकडून याकडे दुर्लक्ष केले जात आहे.

आरटीओ कार्यालयातील सर्व प्रकारची एजेंटशाही व दलाल यंत्रणा तात्काळ समूळ नष्ट करावी आणि सर्वसामान्यांची कामे शासकीय दरामध्ये व ठरलेल्या वेळेत थेट खिडकीवर पूर्ण होतील अशी व्यवस्था उभी करावी. रस्ते तपासणीच्या नावाखाली चेक पॉईंट्सवर चालणारी बेकायदेशीर रोख वसुली पूर्णपणे बंद करून सर्व कारभार पारदर्शक व डिजिटल करावा. अधिकारी व कर्मचाऱ्यांना मुख्यालयात उपस्थित राहणे बंधनकारक करून कार्यालयीन वेळेचा फज्जा उडवणाऱ्या कर्मचाऱ्यांवर प्रशासकीय कारवाई करावी. विनापरवाना व धोकादायक पद्धतीने चालणारी सर्व बेकायदेशीर जुगाडू ऊस वाहतूक तसेच ओव्हरलोड वाहतूक करणाऱ्या वाहनांवर तात्काळ दंडात्मक व कायदेशीर कारवाई करून ती वाहने जप्त करण्यात यावी तसेच प्रशासनाने या मागण्यांवर गांभीर्याने विचार करून कायदेशीर सुधारणात्मक पावले न उचलल्यास, वंचित बहुजन आघाडीतर्फे लोकशाही व सनदशीर मार्गाने तीव्र आंदोलन छेडण्यात येईल, असा इशाराही या निवेदनाद्वारे देण्यात आला आहे.

गृहिणी

आरोग्य

रक्तदानाचे मिळणारे लाभ

रक्तदान हे केवळ दान नाही तर दुसऱ्याला जीवन देण्याचे पुण्यकार्य आहे. मानवी शरीरात साधारणपणे पाच ते सहा लिटर रक्त असते आणि त्यातील केवळ तीनशे पन्नास मिली रक्त काढले जाते जे शरीर चोवीस तासात पुन्हा भरून काढते. अनेक लोकांमध्ये असा गैरसमज आहे की रक्तदान केल्याने अशक्तपणा येतो पण हा समज पूर्णपणे चुकीचा आहे उलट रक्तदान केल्याने शरीरातील रक्ताभिसरण सुधारते. रक्तदान करण्यापूर्वी रक्तदात्याची मोफत आरोग्य तपासणी केली जाते ज्यामध्ये रक्तदाब, वजन आणि रक्तातील हिमोग्लोबिन तपासले जाते. त्यामुळे रक्तदात्याला स्वतःच्या आरोग्याची माहिती देखील मिळते. आपल्या देशात दरवर्षी लाखो पिशव्या रक्ताची कमतरता भासते आणि वेळेवर रक्त न मिळाल्याने अनेक रुग्णांना आपले प्राण गमवावे लागतात. रक्त कृत्रिमरित्या तयार करता येत नाही त्यामुळे मानवानेच मानवासाठी पुढे येणे गरजेचे आहे. रक्तदान केल्यानंतर मिळणारे समाधान आणि एखाद्याच्या चेहऱ्यावरचे हसू हे कोणत्याही पैशापेक्षा मोठे असते. म्हणूनच प्रत्येक सणाला, वाढदिवसाला भेटवस्तू देण्यापेक्षा रक्तदान करून खरे सामाजिक कार्य करावे. याचबरोबर रक्तदानामुळे आपल्या शरीराला अनेक फायदे होतात. रक्तदान केल्याने शरीरात नवीन रक्त तयार होण्याची क्रिया जलद होते आणि रोगप्रतिकारक शक्ती वाढते. नियमित रक्तदान करणाऱ्या व्यक्तीला हृदयविकार आणि रक्तदाब यांसारखे आजार होण्याची शक्यता कमी असते. रक्तदान हे पूर्णपणे सुरक्षित असते कारण प्रत्येक वेळी नवीन सुई वापरली जाते. रक्तदानासाठी केवळ दहा ते पंधरा मिनिटे लागतात पण त्यामुळे एखाद्याचे संपूर्ण आयुष्य वाचू शकते. आज तरुण वर्गाने पुढे येऊन या कार्यात सहभागी होणे खूप गरजेचे आहे. शाळा आणि महाविद्यालयांमध्ये रक्तदानाविषयी जनजागृती झाली पाहिजे जेणेकरून चुकीच्या समजुती दूर होतील. रक्ताला कोणतीही जात किंवा धर्म नसतो त्यामुळे रक्तदान हे मानवतेचे सर्वात मोठे उदाहरण आहे.

पाककला

चॉकलेट गुलाबजाम

साहित्य : खवा १ वाटी, पनीर १/२ वाटी किसलेले, मैदा २ चमचे, कोको पावडर २ चमचे, डार्क चॉकलेट १/२ वाटी बारीक चिरलेले, साखर २ वाट्या, पाणी २ वाट्या, वेलची पूड १/४ चमचा, तळण्यासाठी तेल किंवा तूप

कृती : प्रथम एका परातीत खवा, किसलेले पनीर, मैदा आणि कोको पावडर एकत्र करून मऊ मळून घ्या. मिश्रणाचे छोटे छोटे गोळे करून घ्या. प्रत्येक गोळ्याच्या आत थोडे चिरलेले डार्क चॉकलेट भरून पुन्हा बंद करून गोळा तयार करा. गोळ्याला भेग राहणार नाही याची काळजी घ्या. एका पातेल्यात साखर आणि पाणी घालून एकतारी पाक तयार करा. त्यात वेलची पूड घाला. कढईत मध्यम आचेवर तेल गरम करा. तयार गोळे सोनेरी तपकिरी रंग येईपर्यंत तळून घ्या. तळलेले गरम गुलाबजाम कोमट साखरेच्या पाकात २ तास भिजत ठेवा. चॉकलेट विरघळून आतून रसाळ लागेल.

वास्तू

घर आणि स्वच्छता

* ज्या घरात स्वच्छता नसते तिथे लक्ष्मी वास करत नाही. त्यामुळे रोज सकाळी घर झाडून, मिठाच्या पाण्याने फरशी पुसावी. यामुळे घरातील वाईट शक्ती निघून जाते.

* चुकूनही ईशान्य किंवा आग्नेय कोपऱ्यात शौचालय बांधू नये, यामुळे घरात आजारपण येते.

सौंदर्य

पिकलेल्या पपईचा गर कुस्करून त्यात एक चमचा मध टाका. हा पॅक २० मिनिटे ठेवा. पपईमध्ये असणारे एन्झाइम त्वचा टाइट करतात वृद्धत्व लवकर येऊ देत नाहीत.

सल्ला

खोबरे जास्त दिवस टिकण्यासाठी फ्रिजरमध्ये ठेवावे.

संकलक : ॲड. सौ. पूजा गुंदेचा

दैनिक पंचांग

शनिवार, दि. ७ नोव्हेंबर २०२६

शिवरात्रि, शके १९४८ पराभवनामसंवत्सर, आश्विन कृष्णपक्ष, चित्रा २९।५३, सूर्योदय ०६ वा. २८ मि. सूर्यास्त ०६ वा. ३० मि.

राशिभविष्य

मेष – दिवस धावपळीचा जाणार आहे. जुन्या मित्राची भेट होईल.

वृषभ – पैशाच्या बाबतीत दिवस चांगला आहे. घरात एखादी आनंदाची बातमी येईल.

मिथुन – कामाचा ताण थोडा वाढलेला दिसतो. संध्याकाळी मन प्रसन्न होईल.

कर्क – कुटुंबासोबत वेळ जाईल. एखादी इच्छा पूर्ण होण्याची शक्यता आहे.

सिंह – समाजात मान-सन्मान वाढेल. नवीन ओळखी होतील.

कन्या – अडकलेले काम आज पूर्ण होईल. प्रवासाचे योग दिसत आहेत.

तूळ – दिवस संमिश्र स्वरूपाचा राहील. अचानक खर्च होण्याची शक्यता आहे.

वृश्चिक – आत्मविश्वास वाढलेला राहील. नातेवाईकांकडून आनंदाची बातमी मिळेल.

धनु – नोकरीत नवीन संधी समोर येईल. दिवस उत्साहात जाईल.

मकर – आरोग्य उत्तम राहील. घरातील वातावरण आनंदी असेल.

कुंभ – जुने पैसे परत मिळण्याची शक्यता आहे. दिवस लाभदायक आहे.

मीन – कल्पनाशक्ती वाढेल. कला क्षेत्रातील लोकांसाठी दिवस चांगला आहे.

शब्दगंध क्र. ७५५२ सौ.शैलजा कुलकर्णी



आडवे शब्द :- १) लिंगायत धर्माचे संस्थापक – महात्मा +++++ ५) वाळ्याचे अत्तर ६) कवीची रचना; काव्य; कवन ७) छाया; सावली ८) पडताळा; धरबंध; परस्परसंगती; नेम ११) एकाग्र दृष्टी १३) खबरदार; ध्यानात धर; सावध रहा १६) मार्ग; पथ; रस्ता १७) गरममसाल्यातील एक पदार्थ २०) नवरामुलगा; आशीर्वाद; खाली नसलेला २२) आयते व अचानक मिळालेले धन २३) रस्त्यात अडवून लुटणे २४) कागदाचा चतुर्थांश स्तंभ

उभे शब्द :- १) एक पक्षी; बगळा २) भास्कर; रवि; सूर्य ३) भुतांचा राजा ४) रसाने भरलेले; रसमय ५) प्रयत्न; प्रयास; खटाटोप ९) कष्ट; श्रम १०) विश्रांती; विश्राम; आराम; विराम १२) लग्नाची बायको १४) एकसारखे बोलणे; बडबड – ++++ हिल १५) मुंबईतील एक भाग १८) हिंदू वर्षाचा अकरावा महिना १९) पडलेला २१) विष्णूची पत्नी; लक्ष्मी

शब्दगंध क्र. ७५५१ चे उत्तर

न्या	या	ल	य	■	स	न	द
स	व	य	■	बा	रा	■	र्जा
■	ना	■	स	जा	व	ट	■
य	ल	य	त	र	■	स	ध्या
र	■	ट	र	■	स	र	स
वा	न	वा	■	मा	मा	■	■
■	■	घू	स	■	धा	क	टा
ग	व	ळ	ण	■	न	र	क

फिल्मीचक्कर क्र. १२६१ चे उत्तर

चां	द	नी	बा	र	■	क	■
द	■	ले	■	म	क	स	द
हो	नी	■	भै	ख्या	■	म	■
या	■	अ	■	■	ते	■	मे
आ	ज	क	ल	ते	रे	मे	रे
फ	■	ल	■	■	■	■	पा
ता	■	मं	दा	कि	नी	■	स
ब	■	द	■	मी	ना	क्षी	■

* * * * * * * मुलांचे विश्व * * * * * * *

सुविचार : प्रयत्न करत राहा, कधी कधी शेवटची किल्लीच कुलूप उघडते.

मुलांसाठी भन्नाट माहिती ज्ञानरंजन

आपण हात लावल्यावर लाजाळूचे झाड मिटते का?

लाजाळूच्या झाडाला हात लावल्यावर ते मिटते याचा विचार केला तर आपल्याला निसर्ग किती हुशार आहे याची कल्पना येते. वरवर पाहता हे एक छोटेसे सामान्य झाड वाटते पण त्याच्या आत अनेक आश्चर्यकारक गोष्टी दडलेल्या आहेत. या झाडाच्या प्रत्येक पानाला अनेक छोटी छोटी पाने जोडलेली असतात आणि या प्रत्येक छोट्या पानाच्या बुडाशी एक गादीसारखा फुगीर भाग असतो. हा भाग म्हणजे या झाडाचे खरे रहस्य आहे. या फुगीर भागामध्ये असंख्य अतिशय नाजूक पेशी असतात आणि या पेशींमध्ये पाणी आणि काही नैसर्गिक क्षार भरलेले असतात. हे पाणी म्हणजेच या पानांचा आधार असतो. पाण्याने पेशी पूर्ण भरल्यामुळे त्या टणक होतात आणि त्या टणकपणामुळेच पाने ताठ उभी राहतात आणि सूर्यप्रकाशाकडे तोंड करून अन्न तयार करतात.

जेव्हा एखादा मनुष्य, प्राणी, वारा किंवा पावसाचा थेंब या पानाला स्पर्श करतो तेव्हा त्या ठिकाणी एक सूक्ष्म हालचाल निर्माण होते. ही हालचाल डोळ्यांना दिसत नाही पण ती विजेच्या चमकेपेक्षा वेगाने संपूर्ण पानभर पसरते. आपल्या शरीरात मुंगी चावली की मुंगी चावल्याची बातमी जशी नसांमधून मेंदूपर्यंत जाते अगदी तशीच बातमी या झाडाच्या पेशी एकमेकींना देतात. या बातमीला शास्त्रीय भाषेत संवेदनेची लहर असे म्हणतात. ही लहर जेव्हा त्या फुगीर गादीपर्यंत पोहोचते तेव्हा तेथे मोठा बदल घडतो. गादीमधील पेशींच्या बाहेरील आवरणात असलेली छोटी छोटी तोंडे एकदम उघडली जातात आणि आत साठलेले सर्व पाणी आणि क्षार झटकन बाजूच्या रिकाम्या जागेत ढकलले जातात. एका क्षणात पाणी बाहेर गेल्यामुळे त्या पेशी पिचलेल्या फुग्यासारख्या रिकाम्या होतात. त्यांच्यातील घट्टपणा पूर्णपणे नाहीसा होतो आणि आधारच संपल्यामुळे पाने आपले वजन सांभाळू शकत नाहीत आणि आपोआप मिटून जातात. आधी एक छोटी पाने मिटतात मग त्याच्या मागोमाग दुसरी आणि अशा प्रकारे संपूर्ण फांदी काही सेकंदात खाली झुकून जाते. आता प्रश्न असा येतो की हे झाड असे का करते. याचे उत्तर त्याच्या जगण्याच्या धडपडीत आहे.

फार पूर्वीच्या काळापासून ही वनस्पती जंगलात वाढत होती. जंगलातील हरीण, ससा, शेळी यासारखे अनेक प्राणी हिरवी पाने आवडीने खातात. जर लाजाळूने आपली पाने अशीच ताठ ठेवली तर ते प्राणी सहजपणे तिला खाऊन टाकतील. म्हणूनच स्वतःला वाचवण्यासाठी या झाडाने ही युक्ती आत्मसात केली. जेव्हा पाने मिटतात तेव्हा संपूर्ण झाड सुकलेले, कोमेजलेले, जळालेले किंवा एखाद्या रोगाने ग्रासलेले वाटते. असे सुकलेले झाड कोणताही प्राणी खात नाही.

दुसरे कारण म्हणजे जेव्हा पाने एकदम मिटतात तेव्हा त्यावर बसलेले छोटे छोटे किडे, अळ्या आणि किडे उडून किंवा पडून जातात. त्यामुळे पानांचे किड्यांपासून रक्षण होते. तिसरे कारण म्हणजे वादळ, सोसाट्याचा वारा किंवा मुसळधार पाऊस यापासून बचाव. पाने मिटल्यामुळे वाऱ्याचा जोर पानांवर कमी पडतो आणि पाने फाटत नाहीत. ही मिटलेली अवस्था कायमस्वरूपी नसते. धोका टळल्यानंतर सुमारे पंधरा ते तीस मिनिटांनी पेशी पुन्हा आपले काम सुरू करतात.

बाजूला गेलेले पाणी पुन्हा हळूहळू पेशींमध्ये ओढले जाते. पेशी पुन्हा पाण्याने भरतात, फुगतात आणि घट्ट होतात. त्यामुळे मिटलेली पाने हळूहळू पुन्हा उघडू लागतात आणि पूर्वीसारखी टवटवीत होतात. ही प्रक्रिया पुन्हा पुन्हा होऊ शकते. यातून आपल्याला एक महत्त्वाचा बोध मिळतो की झाडे जरी जागेवरून हलू शकत नसली तरी ती मुकी किंवा भावनाशून्य नसतात. त्यांनाही स्पर्शाची जाणीव असते, त्यांनाही भीती वाटते आणि ती देखील युक्तीने संकटावर मात करतात. म्हणूनच लाजाळूचे झाड हे लहान मुलांसाठी निसर्गाची जिवंत प्रयोगशाळाच आहे.

दुसऱ्याची तुलना

एका घनदाट जंगलात एक कावळा राहत होता. त्याच जंगलात काही सुंदर हंस नुकतेच येऊन राहिले होते. ते हंस पांढरे शुभ्र, उंच आणि त्यांची चाल अतिशय रुबाबदार होती. जंगलातील सर्व प्राणी त्या हंसांची प्रशंसा करत असत. हे पाहून कावळ्याला खूप वाईट वाटे. मलाही हंसासारखे सुंदर दिसले पाहिजे आणि त्यांच्यासारखेच चालले पाहिजे असे त्याला वाटू लागले. एके दिवशी त्याने ठरवले की आजपासून मी हंसासारखे चालणार.

तो हंसांच्या मागे मागे चालू लागला. हंस मान उंच करून, डौलात पाय टाकत चालत होते. कावळ्यानेही आपली मान उंच करण्याचा प्रयत्न केला, पाय लांब लांब टाकू लागला. पण त्याचे पाय लहान आणि वाकडे असल्यामुळे तो सारखा पडत होता. त्याची चाल पाहून सर्व प्राणी हसू लागले. काही दिवस असेच चालल्यामुळे कावळा हंसासारखे चालणे तर शिकला नाहीच, पण तो स्वतःचे मूळ चालणे देखील विसरून गेला.

तो नीट उडूही शकत नव्हता आणि चालूही शकत नव्हता. शेवटी तो एका झाडाखाली निराश होऊन बसला. तेव्हा एका शहाण्या घुबडाने त्याला समजावले की, देवाने प्रत्येकाला वेगळे बनवले आहे. दुसऱ्याची नक्कल करण्यापेक्षा स्वतःमध्ये जे गुण आहेत ते ओळखून जगले पाहिजे. कावळ्याला आपली चूक कळली. त्याने पुन्हा आपल्या मूळ रूपात जगायला सुरुवात केली.

तात्पर्य – दुसऱ्याची नक्कल केल्याने आपण आपले स्वतःचे अस्तित्व देखील गमावून बसतो.

आत्मशक्ति



अध्यात्मिक शक्ती

हा धबधबा अमेरिकन माहिती नसताना आपणास असे वाटेल हा धबधबा एकाच देशाच्या हद्दीत पडतो. अशा प्रकारे अंतरीय मंडळाबाबत घडते. कारण अंतरीव मंडळांचा नकाशा तर नाही. तेथील भागांची, मार्गाची ओळख नाही. म्हणून अंतरीव मंडळाचा प्रवास करणाऱ्यांना ती मंडळे कमी अधिक संख्येने दिसतात. अंतर्मंडळाची यात्रा करणाऱ्या जुन्या प्रवाशांनी दिलेली वर्णने फारच मनोरंजक आहेत व ही वर्णने त्या प्रवासाची इच्छा निर्माण करतात. पण ह्या अनुभवाची खरी अनुभूती आम्ही तेथील यात्रा केली तेव्हाच येईल. सत्याच्याजवळची ही वर्णने समाधान देऊ शकत नाहीत.

समाधान तर तेव्हाच लाभेल जेव्हा ही मंडळे प्रत्यक्ष आपल्या डोळ्यांनी पाहू आणि स्वतः तेथील संगीत कानांनी ऐकू! आजकालच्या ह्या वैज्ञानिक युगात माणसे स्वतःच अनुभव घेऊन एखाद्या गोष्टीवर विश्वास टाकतात. आम्ही दुसऱ्याच्या अनुभवांची वर्णने कितीही ठेवलीत तरी आपल्या अंतरंगाने पहिल्याशिवाय वा अंतःकरणाने ऐकल्याशिवाय अंतरीव मंडळाचा अनुभव आम्हाला येणार नाही. अंतरीचे अमृत पिल्याशिवाय अंतरंग मंडळाचा अनुभव आम्हाला येणार नाही. आम्ही जसजसे संत आणि महापुरुषांचे अनुभव वाचू तेवढाच आम्हाला स्पष्ट होईल की ध्यान साधना द्वारे त्यांनी वाद, लक्षात येईल दुजोरा मिळेल व सत्याचे दर्शन होईल. सांगितलेल्या गोष्टींना दुजोरा मिळेल व सत्याचे दर्शन होईल.अंतरीव मंडळाचे वर्णन अंतरीव मंडळाचे परशीवार वर्णन काही धर्मग्रंथात सापडते. आम्ही जेव्हा हिंदू पुराणे, ख्रिस्ती आणि यहुदी धर्मग्रंथ आणि वेगवेगळ्या संतांचे वाङ्मय तैलमिररिया पाहू तेव्हा त्या जागांच्या पलीकडील अंतरीव मंडळाचे दृश्य आमच्या डोळ्यांपुढे उभे राहते. इतर धर्मग्रंथात विस्तृत वर्णन नाहीत तथापि त्यांचा वरील वर्णनाशी ताळमेळ बसतो. दुर्मिळपणे बहुतेक संतांनी, महात्मा, पैगंबरांनी आणि धर्मसंस्थापकांनी आपले अनुभव लिहिले नाहीत.

(क्रमशः)

(कृपाल आश्रम, अहिल्यानगर)

चिरंतन प्रेमाकडे वाटचाल (नाती घट्ट विणू या)

नाती घट्ट विणू या

चांगली करत असेल पर त्याच्यात आनंद ही होता, त्यांच्याबद्दल ही सर्वात मोठी मागे आहे

सुरेश ओबेरॉय : प्रेमप्रकरण अतिथ आपल्याला काय शिकवतं?

शिवानी सिंधी : प्रेमप्रकरण अतिथ आपल्याला शिकवतं की, एखाद्याचं नाव जर शिवायसुद्धा इतरांशी जास्त चांगलं असतं तर काही काम आहे. एखाद्याचं, इतर लोक तुमच्यासारखी काळजी तुमच्यापेक्षा जास्त चांगल्या प्रकारे एक प्रबळ असतात तर ते काही काम आहे.

सुरेश ओबेरॉय : समोर आपल्या बाळावर आपल्यापेक्षा जास्त प्रेम करते असं जर तुम्हाला वाटत असेल तर तिने या बाबत खूप अस्वस्थ व्हावं, कारण सतत तेथेच तिच्या बाळावर त्याचा पराजय होणार आहे.

शिवानी सिंधी : हो, नक्कीच, पण सारख्या संस्कारांमुळे ती, 'मी असं का नाही केलं?' असा विचार करते. 'बापरे कोण आहे, पहिला क्रमांक कोण आहे,' ही स्पर्धाच भाग आहे.

सुरेश ओबेरॉय : माझी बहीण आम्ही तेव्हा मी खूप लहान होतो. एखाद्याला गावाजवळच्या, हृदयाच्या तो माझा पहिलाच अनुभव होता म्हणून मी खूप दुखातपेज प्रत्येकाचाच प्रवास वेगळा असतो!होतो. अंतरविरोध सुरू असणाऱ्या काही कारणाने तिचा पहिला प्रयत्न पेलला नाही. का कशी असमता त्याला पुन्हा पुन्हा पुन्हा येऊन लाजवत होतं पुढे पण नंतर आता आणि वास्तव तिला लागत पटली. नंतर ते दुसरी, अशा कामामध्ये ते इतरांपेक्षा किती चांगले आहेत याच्या बाळाला भरवला लागते.

शिवानी सिंधी : जेव्हा स्पर्धा आपला संस्कार बनते तेव्हा ती आपोआपच केली जाते. मग आपण ती कोणाच्या टिको, आपल्याच नातेवाईकांबरोबर किंवा कोणत्या प्रमाणात करत आहोत किंवा आपला आपल्या कुटुंबाबरोबर काय परिणाम होत आहे. भारती आपल्या गावाला राहत नाही. आपण आपल्या संस्काराचे बनाविषय पाहिले हवं, कारण तेच आपल्या पुढच्या पिढीकडे जाणार आहेत. त्यात मुलांना अमर्यादित स्पर्धेमध्ये जाणीव करतो ते त्याच्या आयुष्याच्या वातावरणावर स्पर्धा शिकवतात.

सुरेश ओबेरॉय : जर मी माझ्या मुलांना स्पर्धा करायला शिकवलं नाही तर आयुष्याच्या स्पर्धेत ती मागे पडतील.

शिवानी सिंधी : स्पर्धा हा संज्ञा आपण नव्याने विचार करायची गरज आहे.

(क्रमशः)

(प्रजापिता ब्रम्हाकुमारी ईश्वरीय विश्व विद्यालय)

हसा आणि शतायुषी व्हा!

बंडू : मी वजनाचा काटा ५ किलोने मागे केलाय!

गण्या : का रे, त्याने वजन कमी होतं का?

बंडू : नाही रे, पण जेव्हा मी काटा बघतो, तेव्हा मनाला जरा बरं वाटतं!

करुया स्पर्धा परिक्षांची तयारी

* आंतरराष्ट्रीय सौर आघाडीचे मुख्यालय कोठे आहे?

– गुरुग्राम, भारत

– अरविंद ब्राम्हणे, भिंगार मो. ९४०३७३४२८१

आयुर्वेदिक गर्भसंस्कार

आयुर्वेदिक गर्भसंस्कार

घरामध्ये सतत मधुर संगीत, बासरी वादन, तबला वादन, गायत्री मंत्र यांच्या सी.डी. सौम्य आवाजात लावाव्यात. टि.व्ही. वरचे कार्यक्रम भीतीदायक नसावेत. सूड उगविणारे, सूड कथा असणारे चित्रपट, सिरियल्स् बघू नयेत. त्यापेक्षा आनंदी चित्रपट, बाल चित्रपट, डिस्कव्हरी, जास्त घेणे, खाणे यात परस्पर कोंढल्याचे जावे. विटाळ होऊन मानसिक ताण वाढून, असे वातावरण असे नये. गर्भिणी स्त्री नेहमी आनंदी व प्रसन्न असावी. पथ्य आहार : गर्भवती स्त्रीचा आहार गर्भावस्थेच्या गरजेनुसार असावा. ओल्या पदार्थांमध्ये सर्वात जास्त वृद्धी आणि वाढ असते, तर रक्ताच्या सर्वात जास्त गरजा असते. गरोदरपणामध्ये सर्वात जास्त बाळाची वृद्धी होते. परत असते.

आईच्या गर्भात असलेला गर्भ तिच्या आवाजावर, तिच्या मनात वह उगवती जागृत होत असते. आपल्या पिलाचा आपल्या आईत किती आधार मिळतो याची जाणीव बाळामध्ये होत असते. म्हणूनच माझी पिल्याने परतच्या त्या किती सुद्धा गेलेला, जर या काळात आईने शिस्तीने तिच्या मनाला तर तो पुढे भविष्यकाळात बंडखोर, बेईमान व वडिलांचा आदर न देणारा होईल. प्रत्येक स्त्रीने प्रत्येक पिल्याने जागरूक होऊन ही जबाबदारीने आजमावून उचलावी. जन्म झाल्यावर बाळ माता-पित्याच्या जागरूक असाव्यात, कारण तो आवाज त्याला आठवतो, आपली गर्भावस्थेपासूनच त्याने आवाज ऐकलेला असतो. म्हणूनच आईने मधुर वाणीने बोलावे. व तिला मानसिक आधार द्यावा. बटाटा, वांगी, शिळा किंवा वातूळ पदार्थ टाळावे.

(क्रमशः)

डॉ. शारदा निर्मळ-महांडुळे

दुर्वांकुर वंध्यत्व निवारण व गर्भसंस्कार सेंटर

अहिल्यानगर

मोबाईल नं- ८७९३४००४००

कुटुंबामध्ये आनंद, कार्यात सकारात्मकता आणि समाजामध्ये बंधुभाव वाढवण्याचा संकल्प करावा

प्रधान जिल्हा व सत्र न्यायाधीश शिवाजी कचरे यांचे प्रतिपादन; जिल्हा न्यायालयात रंगाला दिवाळी स्नेहमेळावा व फराळ

नगर – दिवाळी हा सण केवळ दिव्यांचा किंवा रोषणाईचा नसून आनंदाचा, मांगल्याचा, प्रेमाचा, आपुलकीचा आणि नवचैतन्याचा सण आहे. अंधारातून प्रकाशाकडे, अज्ञानातून ज्ञानाकडे आणि निराशेतून आशे कडे जाण्याचा संदेश दिवाळीचा सण देत आहे. प्रज्वलित दिवा जसा सर्वाना प्रकाश देतो तसे आपणही आपल्या ज्ञानाने अनुभवाने आणि चांगल्या विचारांनी इतरांचे जीवन उजळण्याचा प्रयत्न केला पाहिजे. आपल्या कामामध्ये प्रामाणिकपणा, संवेदनशीलता आणि माणुसकीची ज्योत सदैव तेवत ठेवली पाहिजे. आपल्या आजूबाजूला असलेल्या एखाद्या गरजू व्यक्तीच्या जीवनात आनंदाचा एक दिवा लावता आला तर तीच खरी दिवाळी आपण समजूया. यासाठी आपल्या कुटुंबामध्ये आनंद, कार्यात सकारात्मकता आणि समाजामध्ये बंधुभाव वाढवण्यासाठी आपण सर्वजण प्रयत्न करण्याचा संकल्प करू, असे प्रतिपादन प्रधान जिल्हा व सत्र न्यायाधीश शिवाजी कचरे यांनी केले.



दीपावलीनिमित्त शहर वकील संघाच्या वतीने आयोजित स्नेहमेळाव्यात मार्गदर्शन करताना प्रधान जिल्हा व सत्र न्यायाधीश शिवाजी कचरे.

दीपावलीनिमित्त शहर वकील संघाच्या वतीने जिल्हा न्यायालयात स्नेहमेळावा व फराळाचे आयोजन झाले. न्यायाधीश शिवाजी कचरे यांच्यासह सर्व न्यायाधीश, वकील व कर्मचारी सहभागी झाले होते. यावेळी जिल्हा न्यायाधीश राजेश गुप्ता, जिल्हा सरकारी वकील सतीश पाटील, शहर वकील संघाचे अध्यक्ष ॲड.कृष्णा झावरे, सेन्ट्रल बार असोसिएशनचे अध्यक्ष ॲड.फारूक शेख, उपाध्यक्ष ॲड.भाऊसाहेब घुले, सचिव ॲड.विनोद शेटे, ॲड.अमोल अकोलकर, ॲड.सारिका झरेकर, ॲड.प्राजक्ता करांडे यांच्यासह पदाधिकारी उपस्थित होते. या स्नेहमेळाव्यात उपोस्थित सर्वांनी दिवाळी फराळाच्या पदार्थांचा आस्वाद घेऊन एकमेकांना दिवाळीच्या शुभेच्छा दिल्या.

कार्यक्रमात ॲड.जय भोसले यांची महाराष्ट्र गोवा बार कॉन्सिलच्या शिस्तपालन समितीवर निवड झाल्याबद्दल तसेच ॲड.विक्रम वाडेकर यांची सन फार्मा माध्यमिक शाळेच्या विश्वस्तपदी नियुक्ती झाल्याबद्दल न्यायाधीश शिवाजी कचरे यांच्या हस्ते सत्कार करून अभिनंदन करण्यात आले.

प्रास्ताविकात ॲड.कृष्णा झावरे म्हणाले, न्यायालयातील रोजच्या ताण तणावातून थोडीशी मोकळीक मिळावी, सर्वांची मनमोकळा संवाद साधता असोसिएशनने या स्नेहमेळाव्याचं आयोजन केले आहे. या कार्यक्रमामुळे सर्व न्यायाधीश व वकिलांमधला स्नेह अधिक वृद्धींगत होत असतो.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन ॲड. युवराज पाटील यांनी केले. ॲड.भाऊसाहेब घुले यांनी आभार मानले.

यावेळी सुरेश भोर, रनजीत गोरे, रजनंदिनी पुंडे, ऐश्वर्या काळे, सतीशचंद्र सुद्रीक, साहेबराव चौधरी, नवनाथ गर्जे, सौरभ काकडे, योगेश काळे, हेमंत कराळे, धनंजय वाघ, लक्ष्मण कचरे, प्रज्ञा उजागरे, अनिता दिघे यांच्यासह वकील उपस्थित होते.

प्रेरणादायी अक्षरधन

नुसती पुस्तकी विद्या काय कामाची?





केवळ पुस्तके शिकणे म्हणजे शहाणे होणे? त्याला हवी अक्कल. ती असते उपजतच. ती फक्त जागृत व्हायला पाहिजे. शिक्षणाने ते केले पाहिजे, अक्कल नसणे हा आंधळेपणाच. आंधळ्यापुढे आरसा धरला, म्हणून काय त्याला त्याच्या चेहऱ्यावरचा डाग पुसता आला? जोवर प्रतिमा जागृत होत नाही, तोवर कितीही ज्ञान पाजले, तरी ते कामी येत नाही. आधी प्रतिभा जागवा. मुलाला स्वतः विचार करू द्या. स्वत:च्या बुद्धीने छोट्याछोट्या समस्या सोडवू द्या. तो स्वत:ची बुद्धी चालवायला शिकला, की शास्त्राचा अधिकारी झाला. अधिकाराविना उपदेश म्हणजे शिपायाने त्याच्या साहेबासाठी काढलेले आदेश. ते व्यर्थच.

ज्ञान घेण्याची क्षमता ज्ञान घेणाऱ्यात यावी. ती शिक्षणाने निर्माण करावी. अक्कल आली की, शिकण्याला अर्थ लाभतो. प्रतिभा म्हणजेच उपजत अक्कल, त्याविना माणूस दुर्बल. ज्ञानाचे ओझे सहन करण्याची शक्ती तर यायला हवी.

संत सोहिरोबा म्हणतात, नुसती नांगर चालवायची आणि पेरणी करायची कला शिकवून काय उपयोग? कोरड्या जमिनीत का पेरणी करून धान्याची उपज होणार आहे? पाऊस पडून शेत भिजल्याची खात्री करून घ्यावी.

गवंडीकाम येते म्हणून चुना विटांचे घर उभारले. पण घरात शिरायला दारच ठेवले नाही आणि तसे म्हणतो, चला, घरात शिरा रे त्याचे हसे होईल. शास्त्र वाचले की ज्ञान आले. असे होत नाही. ते स्वत: उपयोजिले पाहिजे. शास्त्रातील ज्ञानाचा उपयोग कौशल्याने करता आला पाहिजे. कौशल्य श्रमाने प्राप्त होते. ज्ञान व व्यवहार याची मग सांगड घालता येते. एरवी एक संकट टळले की, दुसरे मोठे उभे होते.

शिक्षणाने विद्यार्थी मेधावी व्हावा. मेधा म्हणजे प्रतिभाच. बुद्धीचे नवे नवे उन्मेष दाखविणारी ती प्रज्ञाच. अशी प्रज्ञा ही अमृतात न्हालेली असते. अशी प्रतिमा निर्भयपणे जीनजीवन सुखी करायला समर्थ ठरते. एक पंडित विद्या शिकला. कुत्र्याचे मांजर व सशाचा साप, असे बदल करण्याचे शास्त्र अवगत करून अहमन्य बनला. एकदा एका उंदरामागे मांजर धावले. पंडिताला उंदराची दया आली. उंदीर त्याच्या कुटुंबाकडे धावत होता. त्याच्या कुटुंबातले उंदीर त्याची केविलवाणी अवस्था पाहत होते. पण ते हतबल होते. पंडिताने उंदराला वाचवायला त्या उंदराचं मांजर करून टाकले. आता एक उंदीर वाचला. पण इतर कित्येक उंदरांच्या जिवाला धोका निर्माण झाला. मांजर झालेला उंदीर स्वत: कुटुंबियांच्या जिवावर उठला. सगळा गोंधळ माजला. पंडिताचा उपाय चुकला. शास्त्र होते पण प्रज्ञा नव्हती. म्हणूनच घोटाळा झाला. **– किशोर गांधी**



धनसंपदा ग्रामीण बिगरशेती सहकारी पतसंस्थेचा रौप्यमहोत्सवी टप्पा

वर्धापनदिनानिमित्त ठेवीदारांसाठी विशेष व्याजदराची आकर्षक ऑफर

नगर – कोणत्याही सहकारी संस्थेचा खरा पाया हा केवळ आर्थिक व्यवहारांवर उभा नसतो, तर तो असतो लोकांचा विश्वास, पारदर्शक व्यवहार आणि समाजाप्रती असलेली बांधिलकी. याच मूल्यांची जपणूक करीत धनसंपदा ग्रामीण बिगरशेती सहकारी पतसंस्था मर्यादित, अहिल्यानगर या संस्थेने यशस्वी वाटचालीची २५ वर्षे पूर्ण करून रौप्यमहोत्सवी टप्पा गाठला आहे.



विश्वास हेच धन हे ब्रीदवाक्य सार्थ ठरविणाऱ्या या संस्थेचा प्रवास अत्यंत प्रेरणादायी आहे. २५ वर्षांपूर्वी उद्योजक स्व. अशोक सोनवणे आणि त्यांच्या उद्योजक सहकाऱ्यांनी सहकाराच्या उदात्त विचारातून या संस्थेचे छोटेसे रोपटे अहिल्यानगर एम आय डी सी येथे लावले. सभासद आणि ग्राहकांनी दाखविलेला विश्वास, दिलेले सहकार्य आणि संस्थेशी जोडलेली आपुलकी यामुळे या छोट्याशा रोपट्याचे आज एका भक्कम वटवृक्षात रूपांतर झाले आहे. संस्थेचे मुख्य कार्यालय एम आय डी सी मधील स्व:मालकीच्या दोन मजली भव्य सुसज्ज इमारतीत असून शहरातील नागरिकांच्या सोयीसाठी संस्थेने दिल्ली गेट येथे शाखा सुरू केली आहे.

सध्या संस्थेची धुरा चेअरमन इंजि. सुमित सोनवणे आणि व्हाइस चेअरमन इंजि. मिलिंद गंधे यांच्या नेतृत्वाखाली सक्षमपणे सांभाळली जात आहे. इतर संचालक अरूण विष्णुपंत कुलकर्णी, प्रविण चत्रभुज बजाज, कारभारी मथुजी भिंगारे, सुहास भास्कर मुळे, सौरभ अरूण काळोखे, हरिभाऊ रावजी सोनवणे, लक्ष्मण शाहुराव नजन, संचालिका सुनिता श्रीहरी टिपुगडे, सुनिता अविनाश बोपर्डीकर यांच्या मार्गदर्शनाने आणि कर्मचारीवर्गाच्या योगदानाने संस्थेची प्रगतीची घोडदौड सातत्याने सुरू आहे. विशेष म्हणजे या संस्थेचे सर्व संचालक यशस्वी उद्योजक आहेत.

या २५ वर्षांच्या प्रवासात संस्थेने केवळ आर्थिक व्यवहार केले नाहीत, तर अनेक कुटुंबांच्या स्वप्नांना आर्थिक बळ दिले. गरजू सभासदांना आर्थिक सहाय्य उपलब्ध करून देताना पारदर्शकता, विश्वासार्हता आणि सहकाराची भावना जपली. संस्थेच्या यशामध्ये संस्थापकांचे दूरदृष्टीपूर्ण योगदान, संचालक मंडळाचे मार्गदर्शन, कर्मचाऱ्यांची मेहनत आणि सभासदांचा दृढ विश्वास यांचा मोलाचा वाटा आहे.

रौप्यमहोत्सवी वर्षात पदार्पण करताना संस्थेने भविष्यातील वाटचालीसाठीही महत्त्वाकांक्षी संकल्प केला आहे. आधुनिक बँकिंग सेवांच्या माध्यमातून अधिक सुरक्षित, पारदर्शक आणि लोकाभिमुख आर्थिक सेवा देण्याचा संस्थेचा निर्धार आहे. या रौप्यमहोत्सवी वर्षानिमित्त ठेवीदारांसाठी संस्थेने विशेष भेट जाहीर केली आहे. १३ महिन्यांच्या मुदत ठेवींवर १० टक्के व्याजदराची आकर्षक ऑफर जाहीर करण्यात आलेली आहे. संस्थेची सर्व तारणकर्जे असल्यामुळे ठेवींना १०० टक्के सुरक्षितता आहे. जेष्ठ नागरिकांना घरपोच सुविधा उपलब्ध आहे. स्थावर मालमत्ता, सोने व एल आय सी तारणावर माफक दरात कर्ज सुविधा उपलब्ध आहे. यासंबंधीच्या अधिक माहितीसाठी फोन न.०२४१-२७७७०४९ किंवा मोबा.नं. ९४०५०३०९२१ या नंबरवर संपर्क साधावा व आपली सुरक्षित गुंतवणूक करावी. २५ वर्षांचा विश्वास, आजचा अभिमान आणि उद्याच्या समृद्धीचा संकल्प घेऊन धनसंपदा पतसंस्था सहकाराच्या क्षेत्रात नवा आदर्श निर्माण करण्याच्या दिशेने वाटचाल करीत आहे.

वृद्धेश्वर मल्टीस्टेटच्या माध्यमातून महिलांनी तयार केलेली उत्पादने खातेदारांपर्यंत

दीपावलीत महिला सक्षमीकरणाला देण्यात आले प्रोत्साहन

नगर – अनेक संस्थांद्वारे दीपावलीनिमित्त ग्राहक, खातेदार, सभासद वा आप्तस्वकियांना मिठाई वा भेटवस्तू दिल्या जातात. मात्र, येथील वृद्धेश्वर अर्बन मल्टिस्टेट या शेतकरी आणि महिला केंद्रीत आर्थिक संस्थेने महिला सबलीकरण-सक्षमीकरण आणि स्थानिक महिला उद्योजकांना प्रोत्साहन देण्याच्या हेतूने खाद्योत्सवांतर्गत महिलांनी तयार केलेली अनेकविध उत्पादने आपल्या खातेदारांना व ग्राहकांना दिवाळी भेट म्हणून पाठवली आहेत. संस्थेचे संस्थापक-अध्यक्ष विठ्ठलराव वाडगे, चेअरमन सायली वाडगे, व्हाईस चेअरमन अनिल गावडे व मुख्य कार्यकारी अधिकारी मेघना वाडगे-गावडे यांनी यासाठी पुढाकार घेतला.



नगरमधील वृद्धेश्वर अर्बन मल्टिस्टेट आर्थिक संस्थेने यंदा दिवाळीनिमित्त महिलांनी उत्पादित केलेल्या अनेकविध खाद्यपदार्थांची भेट खातेदार व हितचिंतकांना दिली. संस्थेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी मेघना वाडगे-गावडे यांच्या हस्ते नुकतेच त्यांचे वितरण करण्यात आले.

वृद्धेश्वर अर्बन मल्टीस्टेट संस्थेद्वारे दरवर्षी दिवाळीनिमित्त सहकाऱ्यांना, खातेदारांना आणि हितचिंतकांना कॉर्पोरेट गिफ्टिंग केले जाते. पण यावर्षी भेटवस्तू केवळ देण्यापुरती मर्यादित न राहता, त्यामागे चांगल्या सामाजिक उद्देशाची जोड असावी, या हेतूने स्थानिक महिला उद्योजिका आणि महिला बचत गटांकडून दिवाळी गिफ्टिंगसाठी उत्पादने मागवली. अनेक महिलांनी अनेकविध उत्पादने सादर केली. यातील स्नेहल धर्माधिकारी व सहकारी महिलांची न्याहरी शिदोरी ही आरोग्यदायी उत्पादने निवडली गेली. यात थालीपीठ भाजणी, मूग भजी, मूग डोसा, ढोकळा मिक्स, धिरडे मिक्स अशा विविध उत्पादनांचा समावेश आहे. विविध धान्ये आणि कडधान्यांपासून तयार होणाऱ्या या पदार्थांमुळे आहारात वैविध्य आणण्याचाही संदेश या उपक्रमातून दिला गेला आहे व त्याचा वापर करणारांना विशेष आरोग्यदायी आहाराचा आनंद यातून मिळणार आहे, असे मेघना गावडे यांनी सांगितले.

महत्त्वाचे म्हणजे ही उत्पादने करण्यासाठी महिलांनी केलेली मेहनत व पारंपरिक खाद्यसंस्कृतीशी जोडलेली उत्पादने यांचा विचार करताना ही महिला उद्योजिकांच्या मेहनतीला दिलेली दाद, त्यांच्या व्यवसायाला दिलेली बाजारपेठ व त्यांच्या स्वावलंबनाला दिलेला छोटासा हातभार आहे, असेही त्यांनी आवर्जून सांगितले. अशा छोट्या-छोट्या निर्णयांमधून महिला उद्योजकांना मोठ्या बाजारपेठेशी जोडू शकतो आणि महिला सबलीकरण हा विचार प्रत्यक्ष कृतीत आणू शकतो, असा विश्वासही गावडे यांनी व्यक्त केला.

महिला सबलीकरणासोबत आरोग्यदायी दिवाळीचा संदेश यंदा वृद्धेश्वर अर्बन मल्टिस्टेटने दिला असून, स्थानिक महिला उद्योजिकांच्या पारंपरिक खाद्यपदार्थांना प्रोत्साहन देताना कृतीशील समाजकारण केल्याचा आनंदही त्यांनी व्यक्त केला. स्थानिक उत्पादक, महिला बचत गट आणि महिला उद्योजिकांच्या कष्टांनाही सन्मान मिळायला हवा. कारण, एका महिलेचा व्यवसाय सक्षम झाला, तर तिच्या कुटुंबाच्या आर्थिक प्रगतीला आणि समाजाच्या विकासालाही हातभार लागतो. महिला उद्योजिकांच्या स्वप्नांना बळ देणारी आणि आरोग्यदायी खाद्यसंस्कृतीला प्रोत्साहन देणारी यंदाची दिवाळी ठरावी, हाच संदेश वृद्धेश्वर अर्बन मल्टिस्टेटच्या या अभिनव उपक्रमातून देण्यात आला आहे, असेही गावडे यांनी स्पष्ट केले.



दिवाळी सणाच्या निमित्ताने वाहेगुरु सेवा ग्रुप अहिल्यानगर यांच्यावतीने गुरुद्वारा भाई दयासिंहजी येथे अंधोजन मंडळातील दिव्यांग बांधवांना बबलु खोसला, निप्पु धुप्पड व राकेश गुलाटी यांच्या मार्गदर्शनाखाली किराणा किटचे वाटप करण्यात आले.

वाहेगुरु सेवा ग्रुपच्यावतीने दिव्यांग बांधवांना किराणा किट वाटप

नगर – दिवाळी सणाच्या निमित्ताने वाहेगुरु सेवा ग्रुप अहिल्यानगर यांच्यावतीने गुरुद्वारा भाई दयासिंहजी येथे अंधोजन मंडळातील दिव्यांग बांधवांना बबलु खोसला, निप्पु धुप्पड व राकेश गुलाटी यांच्या मार्गदर्शनाखाली किराणा किटचे वाटप करण्यात आल.

यावेळी गुरुद्वारामध्ये कीर्तन, प्रार्थना तसेच लंगर व अन्नदान महाप्रसाद भंडाऱ्याचे आयोजन करण्यात आले. या प्रसंगी बब्बलु खोसला, निप्पु धुप्पड, राकेश गुलाटी, प्रकाश दरवे, अमर सेवानी, काकासाहेब चांदणे, रींकु वदवा, हितेश ओबेरॉय, डॉ.संदीप कळमकर, वैधनाथ कुलकर्णी, धिरज रामनानी, दिपाली काशिद, प्रदिप पंजाबी, काका खोसला तसेच पदाधिकारी उपस्थित होते.

याप्रसंगी राकेश गुलाटी म्हणाले की, दिव्यांग बांधवांना दिवाळी सणा निमित्ताने दरवर्षी प्रमाणे यंदाही किराणा किट वाटप मानवतेचा संदेश देणारा उपक्रम आहे. वाहेगुरु सेवा ग्रुपच्या माध्यमातून आम्ही नेहमीच गरजू व दिव्यांग बांधवांसाठी कार्य करत राहू.


याप्रसंगी अंधोजन मंडळाचे अध्यक्ष संभाजी भोर, अप्पा खोपसे, संजय घुमटकर, शाम कोकणे, गणेश जाधव यांच्यासह दिव्यांग बांधव व भगिनींनी या उपक्रमाचा लाभ घेतला.

सर्व किराणा किट देणगीदारांचा आभार मानले व आशिर्वाद दिले.

ज्येष्ठ छायाचित्रकार राजू शेख यांचा ६ नोव्हेंबरला 'रेडिओ नगर'वर संवाद

कॅमेऱ्याच्या लेन्समधून उलगडला वृत्तछायाचित्रकारितेचा प्रवास

नगर – पत्रकारिता क्षेत्रात वृत्तपत्र छायाचित्रकाराचे योगदान अत्यंत महत्त्वाचे असते. एखादी घटना शब्दांत मांडण्यापूर्वी ती आपल्या कॅमेऱ्यातून जिवंत करणारा छायाचित्रकार हा पत्रकारितेचा एक महत्त्वाचा आधारस्तंभ असतो. अशाच छायाचित्रणाच्या माध्यमातून अनेक वर्षे पत्रकारितेची सेवा करणारे जुन्या पिढीतील ज्येष्ठ वृत्तपत्र छायाचित्रकार राजू शेख यांच्याशी रेडिओ नगर ९०.४ एफएमच्या विशेष मुलाखतीत मनमोकळा संवाद साधण्यात आला आहे. हा कार्यक्रम ६ नोव्हेंबर रोजी रात्री ९ वाजता रेडिओ नगर ९०.४ एफएमवर प्रसारित होणार आहे.



लोकशाहीचा चौथा स्तंभ

प्रेस फोटोग्राफर या विशेष मुलाखतीच्या माध्यमातून राजू शेख यांनी आपल्या प्रदीर्घ जीवनप्रवासातील अनेक अनुभवांना उजाळा दिला. त्यांची मुलाखत पत्रकार अजय धोपावकर यांनी घेऊन त्यांना विविध विषयांवर बोलते केले. वृत्तपत्र छायाचित्रणाची सुरुवात, त्या काळातील आव्हाने, बातमीसाठी घटनास्थळी पोहोचण्याची धडपड, योग्य क्षण टिपण्यासाठी घ्यावी लागणारी मेहनत आणि छायाचित्रकार म्हणून घडत गेलेला प्रवास अशा विविध विषयांवर त्यांनी आपले अनुभव मांडले.

एकेकाळी फिल्म रोल, निगेटिव्ह, डार्करूम आणि छायाचित्र विकसित करण्याच्या प्रक्रियेतून वृत्तपत्र छायाचित्रणाचा प्रवास सुरू होता. एका महत्त्वाच्या क्षणाचे छायाचित्र टिपण्यासाठी छायाचित्रकाराला प्रचंड संयम, निरीक्षणशक्ती आणि प्रसंगावधान राखावे लागत असे. आजच्या डिजिटल युगात मोबाईल, डिजिटल कॅमेरे, आधुनिक लेन्स आणि अत्याधुनिक तंत्रज्ञानामुळे छायाचित्रणाचे स्वरूप पूर्णपणे बदलले आहे. या बदलत्या छायाचित्रकलेचा प्रवास आणि जुन्या काळातील अनुभव यांची सांगड घालत राजू शेख यांनी आपले विचार व्यक्त केले. ऑनलाइन रेडिओची मुलाखत ऐकण्यासाठी लिंकही उपलब्ध करुन देण्यात आली आहे.

छावनी परिषद शाळा दिवाळीच्या रंगांनी उजळली

नगर – भिंगार येथील पी. एम. श्री. डॉ बाबासाहेब आंबेडकर प्राथ. व माध्यमिक छावनी परिषद शाळेतील विद्यार्थ्यांनी आनंदाची दिवाळी उपक्रमाअंतर्गत विविध कलात्मक व सर्जनशील उपक्रमांचे आयोजन शाळेत केले होते. ५५० विद्यार्थ्यांनी प्रदूषणमुक्त दिवाळी साजरी करण्याची घेतली शपथ घेतली. शाळेतील जवळपास ३०० विद्यार्थ्यांनी स्वत:च्या कल्पकतेतून आकर्षक आकाशकंदील तयार केले. तसेच पणत्या बनवणे या उपक्रमांत विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. यामुळे संपूर्ण शाळा दिवाळीच्या रंगांनी उजळून निघाली होती.



विद्यार्थ्यांमध्ये स्वावलंबन आणि सामूहिक कार्याची भावना रुजवण्यासाठी या उपक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. शाळेची विद्यार्थी पटसंख्या ५५० असून त्यापैकी सुमारे ३०० विद्यार्थ्यांनी आकाशकंदील निर्मितीत सहभाग घेतला. विद्यार्थ्यांनी विविध रंग, कागद आणि सजावटीच्या साहित्याचा वापर करून आकर्षक आकाशकंदील तयार केले. या उपक्रमातून विद्यार्थ्यांच्या हस्तकौशल्याला आणि कलागुणांना वाव मिळाला.

प्रदूषणमुक्त दिवाळीचा संकल्प या उपक्रमांतर्गत विद्यार्थ्यांना फटाक्यांमुळे होणारे वायुप्रदूषण व ध्वनिप्रदूषण आणि त्याचे आरोग्यावरील दुष्परिणाम याविषयी मुख्याध्यापक संजय शिंदे यांनी मार्गदर्शन केले. यावेळी ५५० विद्यार्थ्यांनी फटाकेमुक्त, प्रदूषणमुक्त आणि पर्यावरणपूरक दिवाळी साजरी करण्याची शपथ घेतली.

या कार्यशाळेसाठी मनिषा साठे, अंकुश शेळके, आश्विनी यादव, शरद पुंड, स्नेहल लवांडे, जी. आय. शेख यांचेसह शिक्षकांचे मार्गदर्शन लाभले. तसेच सुभाष भारूड, सीमा चोभे, संजय हजारे, लता पाटील, सायली लेंडे, पल्लवी काळे, काळू हिले यांचेसह मुख्याध्यापक संजय शिंदे यांनी उपक्रमाच्या यशस्वितेसाठी परिश्रम घेतले. छावनी परिषदेचे मनोनित सदस्य वसंत राठोड, शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष जयदेव हेंद्रे यांचेसह सर्व सदस्यांनी या उपक्रमाचे कौतुक केले.

वंचित निराधार विद्यार्थ्यांची दिवाळी गोड

वंचितांची दिवाळी या उपक्रमा अंतर्गत शाळेतील विद्यार्थ्यांमध्ये सामाजिक भावनेचा विकास व्हावा याकरिता स्नेहालयातील निराधार विद्यार्थ्यांची दिवाळी गोड व्हावी याकरिता छावनी शाळेतील विद्यार्थ्यांनी खाऊ, बिस्किटे, कोलगेट, टुथ पेस्ट व ब्रश, आंघोळीचा साबण, सुगंधी उटणे, कंगवे, तेल, कपडे, मेहंदीचे कोन आदींसह विविध वस्तूंची आनोखी भेट स्नेहालयातील प्रतिनीधींकडे सोपवत स्नेहालयातील वंचित निराधार विद्यार्थ्यांची दिवाळी गोड करण्याचा छोटासा प्रयत्न केला. या उपक्रमाच्या यशस्वीतेसाठी पालक वर्गाचा प्रतिसाद लाभला.

'एस.जी.कायगांवकर ज्वेलर्स'मध्ये दागिने खरेदीबरोबरच स्मार्ट फोन जिंकण्याची संधी

दिवाळीनिमित्त खास योजना, पारंपरिक व आधुनिक दागिन्यांचा सुवर्णसंगम

नगर – ८९ वर्षांची सुवर्ण परंपरा असलेल्या नगरमधील एस.जी.कायगांवकर ज्वेलर्सच्या गंजबाजार व सावेडी रस्त्यावरील दालनात खास दिवाळी व लग्नसराईनिमित्त पारंपरिक तसेच आधुनिक दागिन्यांचा सुवर्णसंगम असलेली सोने तसेच हिऱ्याच्या अलंकारांची मोठी व्हरायटी उपलब्ध झाली आहे. या सर्वांगसुंदर दागिन्यांच्या जोडीला या सुवर्ण दालनात दिवाळीनिमित्त दररोज एक स्मार्ट फोन जिंकण्याची संधी देणारी बक्षिस योजनाही सुरू होत आहे. ६ ते १५ नोव्हेंबर २०२६ या कालावधीत या दालनात सुवर्ण अलंकार खरेदी करणाऱ्या ग्राहकांना लकी ड्रॉव्दारे दररोज एक स्मार्ट फोन जिंकता येणार आहे. त्यामुळे यंदा या दालनात केलेली सुवर्णखरेदी ग्राहकांसाठी खऱ्या अर्थाने मौल्यवान व स्मार्ट खरेदी ठरणार आहे, अशी माहिती एस.जी.कायगांवकर ज्वेलर्सचे संचालक सुभाष कायगांवकर यांनी दिली.



एस.जी.कायगांवकर ज्वेलर्सच्या नगर शहरातील सराफ बाजार व सावेडी रस्त्यावरील प्रशस्त व भव्य दालनांत दिवाळी, लग्नसराईसाठी स्पेशल दागिने उपलब्ध करून देण्यात आले आहेत. सोने, चांदी, डायमंडचे खास दागिने या दालनाचे वैशिष्ट्य आहेत. सुवर्ण अलंकारांमध्ये पारंपरिक चुड्या, कंगण, ब्रासलेट, गोखरू, पोहेहार, बकुळी हार, कंठी माळ, मोत माळ, पुतळ्या, ठुशी, पाटल्या, बांगड्या, तोडे अशा विविध दागिन्यांची व्हरायटी येथे आहे. याशिवाय कानातील बारीक टॉप्स, अंगठी, गंठण, पेंडंट सेट, राणी हार, फॅन्सी दोन लाईन, तीन लाईन चेन, नेकलेस हाफ सेट या दालनात आहेत. संपूर्ण भारतात प्रसिध्द असलेल्या कुशल कारागीरांनी तयार केलेल्या कलाकुसरीच्या डिझाईन्सची आभूषणे महिला वर्गाच्या पसंतीस उतरणारी आहेत. एंगेजमेंटसाठी वधूवरांच्या अंगठ्यांची वेगळी फॅशन प्रचलित होत आहे. नवदांपत्याच्या अंगठींची सारखीच डिझाईन ठेवण्यात येते. सोने, रोझ गोल्ड, हिऱ्यांच्या या अंगठ्यांना मोठी मागणी असते. याशिवाय प्लॅटीनम, सोने आणि डायमंडच्या एकत्रित फ्युजन ज्वेलरीलाही मागणी वाढत आहेत. फ्युजन ज्वेलरीमध्ये अंगठ्या, चेन, ब्रासलेट, नेकलेस, टॉप्स यासारखे दागिने उपलब्ध आहेत. महिलांसाठी सौभाग्याचे प्रतिक असलेल्या मंगळसूत्राच्या डिझाईन्सची व व्हरायटीची मोठी रेंज या दालनात आहे. पुरुषांच्या रूबाबदारपणासाठीही सोने, हिऱ्यांचे अलंकार या दालनात आहेत. यात अंगठी, चेन, ब्रासलेट, घड्याळे, टाय पिन, बेल्टचे बक्कल, चष्म्याच्या फ्रेम्स, कुडता बटन, पाचु व माणिक असलेले सोन्याचे व हिऱ्याचे वैशिष्ट्यपूर्ण अलंकार येथे मिळतात. डायमंडच्या दागिन्यांकडेही ग्राहकांचा कल वाढत आहे. डायमंडचे दागिने विश्वसनीयतेसह येथे उपलब्ध आहेत.

चांदीमध्येही पूजा साहित्य, निरंजन, तबक, समई, ताट, तांब्या, ग्लास, गिफ्ट आर्टिकल्स, चांदीच्या नाण्यांची मोठी व्हरायटी या दालनात आहे. तसेच दिवाळीनिमित्त भेट देण्यासाठीचे कॉर्पोरेट गिफ्ट व्हाउचरही उपलब्ध आहेत. एस.जी.कायगांवकर ज्वेलर्सने सध्याच्या डिजिटल युगाचे महत्त्व ओळखून काही वर्षांपूर्वी एसजीके ई–गोल्ड हे मोबाईल ॲप सुरु केले. या ॲपमुळे ग्राहक अगदी २४ बाय ७ घरबसल्या २४ कॅरेट सोने तसेच शुध्द चांदी खरेदी करू शकतात. या ॲपला देशभरातून मोठा प्रतिसाद मिळत आहे. आता याच एसजीके ई गोल्ड पव्दारे ग्राहक २२ कॅरेट शुद्ध सोन्याचीही खरेदी करता येत आहे. किमान १ हजार रुपयांच्या पटीत डिजिटल स्वरुपात २२ कॅरेट सोन्याची खरेदी करता येते. भारतात प्रथमच २२ कॅरेट सोने खरेदी डिजिटल ॲपव्दारे करण्याची सुविधा एसजीके ई गोल्ड ॲपव्दारे उपलब्ध झाली आहे. नियमित बचतीतून सुरक्षित व भविष्यात उपयोगी ठरणारी सोने खरेदीची सुवर्णसंधी या एसजीके ई गोल्ड ॲपमुळे उपलब्ध झाली आहे.



ॲड. स्वाती जाधव यांना राज्यस्तरीय 'कर्तृत्ववान मराठा नवदुर्गा' पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.

'कर्तृत्ववान मराठा नवदुर्गा' पुरस्काराने ॲड. स्वाती जाधव सन्मानित

नगर – अखंड मराठा साम्राज्य फाउंडेशन (ट्रस्ट) यांच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या राज्यस्तरीय 'कर्तृत्ववान मराठा नवदुर्गा सन्मान सोहळा २०२६' मध्ये शिवसेना महिला आघाडीच्या जिल्हाप्रमुख ॲड. स्वाती राजेंद्र जाधव यांना त्यांच्या उल्लेखनीय सामाजिक कार्याबद्दल सन्मानित करण्यात आले. पुणे येथील भारतरत्न पंडित भीमसेन जोशी कलामंदिर, औंधगाव येथे हा गौरव सोहळा पार पडला.

ॲड. स्वाती जाधव यांनी सामाजिक क्षेत्रासह राजकीय क्षेत्रातही सक्रिय सहभाग घेत विविध समाजोपयोगी उपक्रमांच्या माध्यमातून आपले कार्य सुरू ठेवले आहे. त्यांच्या या कार्याची दखल घेत त्यांना राज्यस्तरीय पुरस्काराने गौरविण्यात आले. या सन्मानामुळे भविष्यात अधिक जोमाने सामाजिक कार्य करण्यासाठी नवी ऊर्जा आणि प्रेरणा मिळाली असल्याची भावना त्यांनी व्यक्त केली.

ॲड. स्वाती जाधव यांनी सामाजिक क्षेत्रासह राजकीय क्षेत्रातही सक्रिय सहभाग घेत विविध समाजोपयोगी उपक्रमांच्या माध्यमातून आपले कार्य सुरू ठेवले आहे. त्यांच्या या कार्याची दखल घेत त्यांना राज्यस्तरीय पुरस्काराने गौरविण्यात आले. या सन्मानामुळे भविष्यात अधिक जोमाने सामाजिक कार्य करण्यासाठी नवी ऊर्जा आणि प्रेरणा मिळाली असल्याची भावना त्यांनी व्यक्त केली.

सोहळ्यास राज्यमंत्री सौ. मेघनाताई साकोरे बोर्डीकर, पुणे गुन्हे शाखेच्या खझड अधिकारी तेजस्विनीताई सातपुते, समाजसेविका डॉ. ज्योतीताई विनायकराव मेटे व मुंबईच्या महापौर सौ. रितुताई राजेश तावडे आदी उपस्थित होते.

हा पुरस्कार केवळ माझा वैयक्तिक सन्मान नसून, माझ्या प्रत्येक सुख–दुःखात खंबीरपणे साथ देणाऱ्या कुटुंबीयांचा, मित्रपरिवाराचा, सहकाऱ्यांचा आणि हितचिंतकांचा आहे. सर्वांच्या प्रेमामुळे, विश्वासामुळे आणि आशीर्वादामुळेच हा प्रवास शक्य झाला आहे, अशी भावना ॲड. स्वाती जाधव यांनी व्यक्त केली.

मर्चंटस को–ऑप. बँकेच्या सभासदांना ३ कोटी ५ लाखांच्या लाभांशाचे वाटप



संजय चोपडा (चेअरमन)

नगर – अहमदनगर मर्चंटस को ऑप बँकेने सन २०२५ – २०२६ या आर्थिक वर्षासाठी जाहीर केलेला १५ टक्के लाभांश सभासदांच्या बँकेतील खात्यावर जमा करण्यात आला आहे. दिवाळीच्या उत्सव काळात हा लाभांश सभासदांना प्राप्त झाला आहे. उत्कृष्ट आर्थिक कारभाराची परंपरा कायम ठेवत बँकेने सभासदांना ३ कोटी ५ लाख रुपये लाभशांपैकी २ कोटी १० लाख सभासदांच्या खात्यात वर्ग केले आहेत तसेच बँकेत खाते नसलेल्या सभासदांनी आपला लाभांश त्वरित घेऊन जाण्याबाबत माहिती चेअरमन संजय चोपडा यांनी दिली.

संजय चोपडा यांनी सांगितले की, बँकेचे संस्थापक चेअरमन हस्तीमल मुनोत यांच्या नेतृत्वाखाली बँकेने सभासदांची विश्वासार्हता कायम जपली आहे. अत्याधुनिक बँकिंग सेवा देतानाच काटकसरीने कारभार आणि सभासद हित याला नेहमीच प्राधान्य दिले जाते. स्पर्धेच्या युगात सर्वोत्कृष्ट डिजिटल बँकिंग सेवा दिली जाते. विविध कर्ज योजनांतून व्यापार, व्यवसाय, उद्योगांना चालना दिली जाते. 'मर्चंटस बँक जिथे, लक्ष्मी वास करे तिथे' हे ब्रीद सार्थ ठरवणारी वाटचाल बँकेचे वैशिष्ट्य आहे.

याही वर्षी दिवाळी आधी बँकेत खाते असणाऱ्या सभासदांना लाभांश वितरण करण्यात आले आहे व ज्या सभासदांचे खाते बँकेत नाही अशा सभासदांनी आपले खाते लवकरात लवकर उघडून घ्यावे व लाभांश आपल्या खाती जमा करून घ्यावा तसेच ज्या सभासदांचे खाते Inoperative असेल अशा सभासदांनी आपले खाते कार्यान्वित करावे असे आवाहन संजय चोपडा यांनी केले व सर्व सहकारी संचालक, बोर्ड ऑफ मॅनेजमेंटचे सदस्य, मुख्य कार्यकारी अधिकारी नितीन भंडारी, बँकेचे अधिकारी व कर्मचारी यांचे सहकार्य लाभल्याचे त्यांनी सांगितले.



वडगाव गुप्ता येथील ब्ल्यू डायमंड स्कूलमधील विद्यार्थ्यांनी फटाके न फोडता गरजूंना मदत करण्याचा संकल्प केला.

फटाके न फोडता गरजूंना मदत करण्याचा विद्यार्थ्यांचा संकल्प

नगर – वडगाव गुप्ता येथील ब्ल्यू डायमंड स्कूलमध्ये प्रत्येक वर्षी राबविल्या जाणाऱ्या नवनवीन उपक्रमासोबत विद्यार्थ्यांमध्ये सहानुभूती, प्रेम, परिस्थितीची जाणीव या मूल्यांची रूजवणूक करण्यासाठी याही वर्षी इयत्ता ९ वीचे विद्यार्थी व शिक्षक यांनी स्कूलचे प्राचार्य व उपप्राचार्य यांच्या मार्गदर्शनाखाली आनंदऋषी अपंग विद्यालयास भेट देऊन तेथील अपंग विद्यार्थ्यांसोबत दीपावली साजरी केली.

विद्यार्थ्यांनी अपंग गरजू विद्यार्थ्यासाठी मिठाई, दिवाळी फराळ, बिस्किटे, दैनदिन उपयोगी वस्तू, किराणा, तसेच मुलीसाठी ज्वेलरी, मेहंदी कोन अशा वस्तू आणल्या होत्या. या सर्व वस्तू अपंग गरजू विद्यार्थ्यांना दिल्यानंतर तेथील मुलांच्या चेहऱ्यावरील आनंद पाहून विद्यार्थ्यांचा आनंद द्विगुणित झाला. अपंग मुलांची परिस्थिती पाहून उपस्थित सर्वच विद्यार्थ्यांची मने भरवून गेली. आपल्याजवळ जे आहे, त्याबद्दल काही तक्रार न करता आपण समाधान मानावे, असे विचार विद्यार्थ्यांनी व्यक्त केले. सोबतच आपण स्वतः दिवाळीमध्ये फटाके न फोडता प्रदूषणमुक्त दीपावली साजरी करण्याचा व त्या खर्चाच्या बदल्यात एखाद्या गरजू मुलांना मदत करण्याचा संकल्प स्कूलमधील विद्यार्थ्यांनी केला.

'चित्रपट महर्षी दादासाहेब फाळके जयंतीनिमित्त सन्मान कलावंतांचा पुरस्कार' पै.नाना डोंगरे यांना प्रदान



नगर – चित्रपट महर्षी दादासाहेब फाळके जयंतीनिमित्त दिला जाणारा सन्मान कलावंतांचा पुरस्कार'अहिल्यानगरचे पै. नाना डोंगरे यांना प्रदान करण्यात आला. नाशिक येथे आयोजित कार्यक्रमात अभिनेत्री शिल्पा शाहीर यांच्या हस्ते त्यांचा सन्मान करण्यात आला.

कलावंत विचार मंच, नाशिक आणि कमल फिल्म प्रोडक्शन, कमल म्युझिक मराठी यांच्या संयुक्त विद्यमाने हा पुरस्कार सोहळा आयोजित करण्यात आला होता. म.सा. नाट्यगृह, पंडित नेहरू गार्डन, शालिमार, नाशिक येथे झालेल्या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी कवयित्री जयश्री वाघ होत्या. यावेळी स्वागताध्यक्ष सुनील मोफ्लढे, अभिनेत्री श्रुती देशमुख, कवी संजय आहेर, आनंदा साळवे, शाहीर सुनील चिंचोळीकर आदी उपस्थित होते.

पै. नाना डोंगरे हे स्व. पै. किसनराव डोंगरे बहुउद्देशीय संस्थेचे अध्यक्ष असून ग्रामपंचायत सदस्य म्हणूनही कार्यरत आहेत. नगर तालुक्यासह अहिल्यानगर जिल्ह्यात त्यांनी सामाजिक, शैक्षणिक, सांस्कृतिक, क्रीडा, साहित्यिक आणि धार्मिक क्षेत्रात उल्लेखनीय योगदान दिले आहे. वृक्षारोपण व वृक्षसंवर्धन, स्वच्छता अभियान, जलसंधारण जनजागृती, रक्तदान शिबिरे, मतदार जनजागृती, महिला सक्षमीकरण आणि स्त्री जन्माचे स्वागत अशा विविध उपक्रमांतून त्यांनी सामाजिक बांधिलकी जपली आहे.

ग्रामीण युवक व महिलांना व्यासपीठ उपलब्ध करून देण्याबरोबरच त्यांनी आठ राज्यस्तरीय काव्य संमेलने आणि सहा ग्रामीण मराठी साहित्य संमेलने यशस्वीपणे आयोजित केली आहेत. त्यांच्या या बहुआयामी सामाजिक आणि साहित्यिक कार्याची दखल घेऊन त्यांना हा पुरस्कार प्रदान करण्यात आला.



टायटल व्हेरिफिकेशन नोटीस

तमाम लोकास या जाहीर नोटीसाद्वारे कळविण्यात येते की खालील परिशिष्टात नमुद केलेली मिळकत ही विद्यमान मालक **कनुभाई आबालाल पटेल, प्रभुबाई आबालाल पटेल, नरेंद्रभाई रामणभाई पटेल, कपिलाबेन प्रभुदास पटेल, निमेश प्रभुदास पटेल, प्रितल प्रशांत पटेल, मितुल प्रभुदास पटेल, हितेन प्रभुदास पटेल, प्रकुंज हर्षद पटेल (७/१२ प्रमाणे प्रकुंज हर्षद गांधी), विनल राहुल गांधी, मयुरी हर्षद पटेल, सुलेखाबेन हर्षकुमार पटेल सर्व रा. युनायटेड स्टेट ऑफ अमेरिका** यांच्या वडिलोपार्जित मालकी वहीवाटीची मिळकत असून त्यांचे प्रत्यक्ष कब्जात आहे. सदर मिळकतीचे विद्यमान मालक यांचे असे म्हणणे आहे की, सदर मिळकतीवर इतर कोणाचाही बोजा नसून सदर मिळकत ही निर्वेध, निजोखमी व बिनबोजाची असून त्यामध्ये दुसऱ्या कोणाचाही कोणत्याही प्रकारे कसलाही बोजा, मालकी हक्क हितसंबंध अगर कब्जा नाही. तथापि सदर मिळकतीमध्ये विदयमान मालकांव्यतिरिक्त इतर कोणाचाही गहाण, दान, बक्षिस, भाडेपट्टा, खरेदीखत, साठेखत, वारस हक्क, कुळ वहिवाट इत्यादी कोणत्याही प्रकारचा कसलाही मालकी हक्क हितसंबंध असल्यास त्यांनी ही जाहीर नोटीस प्रसिध्द झालेपासून **८ दिवसाचे** आत लेखी स्वरुपात कागदपत्रानिशी आमची खात्री पटवावी. निर्धारित मुदतीत कोणाचीही हरकत प्राप्त न झाल्यास सदर मिळकतीबाबत कोणत्याही व्यक्तीचा कोणताही हक्क, दावा अथवा हितसंबंध नाही किंवा असल्यास त्यांनी तो जाणीव पुर्वक सोडून दिलेला आहे असे समजण्यात येईल व सदर मिळकत ही निर्वेध व निजोखमी आहे असे समजण्यात येईल, नंतर कोणाचीही कसलीही तक्रार चालणार नाही याची नोंद घ्यावी.

परिशिष्ट

जि. तुकडी अहिल्यानगर पोट तुकडी, ता. नगर पैकी अहिल्यानगर महानगरपालिका हद्दीतील केडगाव येथील खालील वर्णनाची शेतजमीन मिळकत.

सर्व्हे नं.	क्षेत्र	आकार
१८८/१	२हे.११आर.	४ रु.१८पैसे

+ पो.ख.०हे.०७आर,

२हे. १८आर. एकूण क्षेत्र

सदर सर्व्हे नं. १८८/१ च्या चतुःसिमा खालीलप्रमाणे –

पुर्वेस – गट नं. १८८/२ व रेल्वे लाईन,
दक्षिणेस – १२.००मी. रुंदीचा रस्ता,
पश्चिमेस – गंट नं. १८७, उत्तरेस – सर्व्हे नं. १८९ व रस्ता,
येणेप्रमाणे चतु:सिमापुर्वक शेतजमीन मिळकत त्यामधील तद्गंभुत वस्तुसह, वागवहिवाटीचे हक्कांसह काही एक राखून न ठेविता.
अहिल्यानगर, दिनांक – ०६/११/२०२६

ॲड. सुनिल गोरक्षनाथ हरीश्चंद्रे
ॲड. ओंकार पंडीत मोरे
ऑफिस– गाळा नं. ४, महालक्ष्मी चेंबर्स,
पाईपलाईन रोड, सावेडी, अहिल्यानगर. मो.नं. ९८६०६४६४६३

जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहिर नोटीसीद्वारे कळविणेत येते की, खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेल्या मिळकतीच्या विक्रीचा व्यवहार आमचे आशिलांबरोबर ठरलेला आहे. सदर व्यवहारापोटी आमचे आशिलांनी विद्यमान मालकांना विसार रक्कम दिलेली आहे. सदर प्लॉट मिळकतीवर **कान्हुर पठार मल्टी स्टेट को ऑप क्रे. सोसा. मर्यादीत व अशोक सहकारी बँक लिमिटेड चे** कर्ज असुन, त्या व्यतीरीक्त सदर खाली नमुद मिळकत निर्वेध, निजोखमी आहे, असे विद्यमान मालकांचे म्हणणे आहे, परंतु कोणाचीही तक्रार राहू नये म्हणून या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, सदर मिळकतीबाबत कोणताही चालू वाद असल्यास अथवा **कान्हुर पठार मल्टी स्टेट को ऑप क्रे. सोसा. मर्यादीत व अशोक सहकारी बँक लिमिटेड** व्यतीरीक्त इतर कोणाकडे गहाण, दान, बक्षिसपत्र, अव्वल जप्ती, बँक बोजा, भाडेकरार, साठेकरार, मदार, मनाई हुकूम, स्थगिती, पोटगी, चार्ज, लीज, इजमेंट, अगर इतर कोणताही चालू वाद असल्यास संबंधीतांनी ही जाहिर नोटीस प्रसिध्द झालेपासून **७ दिवसांचे** आत खालील पत्त्यावर समक्ष, लेखी अथवा रजिस्टर्ड पोस्टाने योग्य त्या कागदपत्रांच्या प्रमाणित नकलांसह आम्हास कळवावे व आमची खात्री करून द्यावी. विहित मुदतीत कोणाचीही, कोणतीही हरकत न आल्यास, ज्याचे काही हक्क, हितसंबंध आहेत त्यांनी ते जाणीवपुर्वक सोडून दिले आहेत, असे समजून आमचे आशिल खरेदीचा व्यवहार पुर्ण करतील. मग कोणाचीही तक्रार चालणार नाही, याची नोंद घ्यावी.

परिशिष्ट मिळकत वर्णन :– जिल्हा तुकडी व पोट तुकडी तालुका अहिल्यानगर पैकी, मा. दुय्यम निबंधक, अहिल्यानगर यांचे कक्षेतील, अहिल्यानगर महानगरपालिका हद्दीतील **मौजे केडगाव** येथील निर्वेध, निजोखमी मिळकत खालील वर्णनाची –

गट क्रं./स.नं.	क्षेत्रफळ
१४९/१	० हे. ८१ आर

यापैकी नगर – दौंड रस्त्यासाठी संपादित झालेले ० हे. ११ आर क्षेत्र सोडुन उर्वरीत संपुर्ण ० हे. ७० आर क्षेत्राबाबत

यांसी चतुःसिमा :–

पुर्वेस :– नगर – दौंड रस्ता, दक्षिणेस :– गट क्र/स.नं. १४९/१,
पश्चिमेस :– रेल्वे लाईन, उत्तरेस :– गट क्र/स.नं. ११५०.

सदर मिळकतीचे विद्यमान मालक –

१) श्री. मयुर वसंतलाल शेटिया,
रा. आरिहंत कॉलनी, मार्केट यार्ड जवळ, अहिल्यानगर.
२) श्री. विजय विष्णुप्रसाद मर्दा, रा. स्टेशन रोड, अहिल्यानगर.

ॲड. शामसुंदर व्हि. भुतडा
ऑफिस : शॉप नं. ९, पुजा अपार्टमेंट सहकार सभागृह रोड,
अहिल्यानगर. मो.नं. ९४२३७९२९२२

जाहीर नोटीसीस हरकत

तमाम लोकांस व विशेष करुन **ॲड. मोहसीन इलियास शेख, पत्ता. शॉप नं.१ व २, कस्तुरी प्लाझा, कलेक्टर ऑफीस जवळ, डावरे गल्ही, अहिल्यानगर. व त्यांचे अशिल** यांस प्रस्तुत जाहिर नोटीसीस हरकतीद्वारे कळविण्यात येते की, जिल्हा अहिल्यानगर पोटतुकडी व तालुका अहिल्यानगर पैकी मौजे भिंगार येथील कॅन्टॉन्मेंट हद्दीतील १. सर्व्हे नं.२११/७५ याचा घर नं.१२९ चे क्षेत्रफळ १९८४.०० चौ.फुट याचे १८४.३८ चौ.मी. यापैकी ५३.८८ चौ.मी. याचे ५८०.०० चौ.मी. यातील बांधकाम ५३.८८ चौ.मी. चे ५८०.०० चौ.मी. लाईट मीटर, नळ कनेक्शसह व १. सर्व्हे नं.२११/७२ याचा घर नं.१२८ चे क्षेत्रफळ २५०.०० चौ.फुट याचे २३.२३ चौ.मी. यातील बांधकाम २३.२३ चौ.मी. लाईट मीटर, नळ कनेक्शसह. या मिळकतीचे विद्यमान मालक **अर्जुन माधव वराडे** रा. ऑक्सी व्हॅली फेज–२, ए विंग, फ्लॅट नं.११०४, बकोरी रोड, वाघोली, पुणे दर्शवुन सदर मिळकतीबाबत **तारीख ०४/११/२०२६ रोजी दैनिक नवा मराठा या वर्तमान पत्रामध्ये ॲड. मोहसीन इलियास शेख** यांच्या मार्फत जाहिर नोटीस प्रसिध्दीस दिलेली असुन त्यास आमचे अशिल नामे **राजेंद दत्तात्रय वराडे, विनय दत्तात्रय वराडे व सुनिल दत्तात्रय वराडे** सर्व रा. घर नं.१२९, मोमिन गल्ही, भिंगार कॅन्टोन्मेंट, भिंगार, अहिल्यानगर यांची सक्त हरकत आहे. सदर हरकतीचे कारण असे की जाहिर नोटीसीमध्ये नमुद मिळकती या आमच्या अशिलाच्या व सदर जाहिर नोटीसीमध्ये नमुद **अर्जुन माधव वराडे** यांच्या वडिलोपार्जित मालकीच्या आहेत. सदर जाहिर नोटीसीमध्ये घर नं.१२९ मध्ये संपुर्ण मिळकती आमच्या अशिल त्यांच्या परिवारासह राहत आहेत तसेच घर नं.१२८ देखील आमच्या अशिलाच्या कब्जात व ताब्यात आहे सदर मिळकती सर्व्हे नं.२११/७५ याचा घर नं.१२९ व सर्व्हे नं.२११/७२ याचा घर नं.१२८ या दोन्ही मिळकती सदर वराडे कुटुंबाचे मुळ पुरुष रघुनाथ शंकर वराडे यांच्या मालकीच्या होत्या व त्यांचे निधन झाल्यावर सदर मिळकतीमध्ये त्यांची सहा मुले नामे रामचंद्र, विष्णुपंत, नारायण, केशव, माधव, मुरलीधर यांचा वारसाहक्काने मालकीहक्क व अधिकार निर्माण झालेला होता व आहे. मयत रघुनाथ शंकर वराडे यांचे सर्व सहा मुलांचे निधन झालेले असुन आमचे अशिल हे मयत रामचंद्र रघुनाथ वराडे यांचे वारस– नातु आहेत. तसेच जाहिर नोटीसीमध्ये नमुद अर्जन माधव वराडे हा माधव रघुनाथ वराडे यांचा मुलगा आहे त्यामुळे सदर जाहिर नोटीसीमध्ये नमुद अर्जुन माधव वराडे यांच्या मालकीचे क्षेत्र चुकीचे नमुद आहे व तसेच मयत माधव रघुनाथ वराडे यांना अर्जुन माधव वराडे याच्या व्यतिरिक्त दोन मुली नामे बेबी व सरोजिनी देखील आहेत. सदर बाब अर्जुन माधव वराडे यांनी जाणुन – बुजुन लपवुन सदर सर्व्हे नं.२११/७५ याचा घर नं.१२९ व सर्व्हे नं.२११/७२ याचा घर नं.१२८ या दोन्ही मिळकतीमध्ये जाहिर नोटीसीमध्ये नमुद क्षेत्रफळाप्रमाणे मालकी नसताना देखील चुकीची व खोटी माहिती देऊन बेकायदेशीर पणे जास्त क्षेत्रफळाची मालकी असल्याचे भासवुन ॲड. मोहसीन इलियास शेख यांच्या अशिलास सदर मिळकतीमध्ये व्यवहार करण्यास प्रवृत्त केलेले आहे. तसेच सदर सर्व्हे नं.२११/७५ याचा घर नं.१२९ व सर्व्हे नं.२११/७२ याचा घर नं.१२८ या दोन्ही मिळकती आमच्या अशिलाच्या वडिलोपार्जित मिळकती असुन मयत रघुनाथ शंकर वराडे यांच्या सर्व वारसांमध्ये अद्यापपावेतो सदर मिळकतींचे व मयताच्या इतर मिळकतींचे सरस–निरस मानाने वाटप झालेले नसल्यामुळे खोटी, बोगस व बेकायदेशीर माहितीच्या आधारे अर्जुन माधव वराडे यांना सदर मिळकतीमध्ये कुठल्याही प्रकारचे खरेदी विक्री करण्याचे अथवा मिळकत हस्तांतरण करण्याचे अधिकार मुळीच नाही कारण सदर सर्व्हे नं.२११/७५ याचा घर नं.१२९ व सर्व्हे नं.२११/७२ याचा घर नं.१२८ या दोन्ही मिळकतीमधील असलेल्या सहहिस्सेदारांचा हिस्सा घेण्याचा प्रथम अग्रहक्क (Preferential right) आमच्या अशिलाचाच आहे व आमचे अशिल सदर हिस्सा खरेदी घेण्यास सदैव तयार होते व आहेत. त्यामुळे अर्जुन माधव वराडे यांच्याबरोबर ॲड. मोहसीन इलियास शेख यांच्या अशिलांनी कुठलाही व्यवहार केल्यास तो पुर्णपणे बेकायदशीर राहिल व आमच्या अशिलावर बंधनकारक राहणार नाही व तसेच संबंधितांना सदर मिळकतीमध्ये कुठलाही अधिकृत कब्जा, ताबा, मालकी व टायटल मिळणार नाही, **त्यामुळे ॲड. मोहसीन इलियास शेख** यांच्या मार्फत अर्जुन माधव वराडे यांना मिळकत मालक म्हणुन दर्शवुन दिलेल्या खोटया माहितीच्या आधारे प्रसिध्द झालेल्या खोटया जाहिर नोटीसीच्या आधारे कुठल्याही प्रकारचा मिळकत खरेदी विक्रीचा व्यवहार झाल्यास संबंधित खरेदीदारांना मिळकतीची कायदेशीर मालकी, कब्जा, ताबा व टायटल प्राप्त होणार नाही व विनाकारण गुंतागुंत व वाद निर्माण होईल याची नोंद **ॲड. मोहसीन इलियास शेख** व **त्यांचे अशिलांनी घ्यावी व यदाकदाचित सदर खोटया बोगस जाहिर नोटीसीच्या आधारे व्यवहार केल्यास अथवा खरेदीखत नोंदविल्यास संबंधितांविरुध्द योग्य ती न्यायालयीन कारवाई केली जाईल याची नोंद घ्यावी.** विनाकारण कोणाचीही फसवणुक होऊ नये या हेतुने प्रस्तुत जाहिर नोटीसीस हरकत प्रसिध्द केली असे.

येणे प्रमाणे जाहिर नोटीसीस हरकत प्रसिध्द केली आहे.

दि. ०६/११/२०२६ **ॲड. समीर वखारे**

पत्ता :– ऑफीस नं.५, पहिला मजला, साई कॉर्नर बिल्डींग, चितळे रोड, अहिल्यानगर. मो. नं. ९०१९६७८९९९. ९८६०८०५५५९

श्री अहमदनगर ओसवाल पंचायत सभा. अ. नगर

शहाजी रोड, अहिल्यानगर–४१४००१

वार्षिक सर्वसाधारण सभा

(फक्त सभासदांसाठी)

श्री अहमदनगर ओसवाल पंचायत सभा, अ.नगर या संस्थेची वार्षिक सर्वसाधारण सभा शुक्रवार दिनांक २७/११/२०२६ रोजी सकाळी ११ वा. केशरगुलाब मंगल कार्यालय येथे संस्थेचे अध्यक्ष मा. श्री. नरेंद्रजी शांतीकुमारजी फिरोदिया यांचे अध्यक्षतेखाली होणार आहे. तरी आपण वेळेवर उपस्थित रहावे ही विनंती.

ठिकाण– अहिल्यानगर,
दिनांक– ०६/११/२०२६

शैलेश सुरेशलालजी मुनोत
प्रधानमंत्री

टिप–

१) कोरमअभावी सभा तहकुब झाल्यास हीच सभा त्याच ठिकाणी अर्धा तासाने घेण्यात येईल व अशा सभेस कोरमची आवश्यकता भासणार नाही.

२) सदर संस्थेचा अहवाल व विषयपत्रिका सभासदांच्या व्हॉटस ॲपवर पाठविला जाणार आहे.



विज्ञानविश्वाची माहितीपूर्ण रंजक सफर

विज्ञानवार्ता

व्हॉटस्‌ॲपसाठी पैसे मोजावे लागणार?

व्हॉटस्‌ॲप वापरणाऱ्या जगभरातील कोट्यवधी युजर्ससाठी एक मोठी आणि महत्त्वाची बातमी समोर येत आहे. आतापर्यंत पूर्णपणे मोफत असलेल्या या मेसेजिंग ॲपचा अनुभव भविष्यात बदलण्याची शक्यता आहे. मेटा कंपनी व्हॉटस्‌ॲपसाठी एका विशेष सबस्क्रिप्शन प्लॅनवर काम करत असून, लवकरच युजर्सना जाहिरातमुक्त अनुभवासाठी पैसे मोजावे लागू शकतात. या बदलामुळे व्हॉटस्‌ॲपच्या मोफत सेवेच्या युगाला काही प्रमाणात ब्रेक लागण्याची चिन्हे आहेत.



मिळालेल्या माहितीनुसार, व्हॉटस्‌ॲपच्या स्टेटस आणि चॅनेल्स या विभागात जाहिराती दाखवण्याची तयारी मेटा कंपनीने केली आहे. गेल्या काही काळापासून यावर सातत्याने काम सुरू असून आता नव्या सबस्क्रिप्शन मॉडेलचे संकेत व्हॉटस्‌ॲपच्या २.२६.३.९ या बीटा व्हर्जनच्या कोडमध्ये दिसून आले आहेत. तुम्हाला व्हॉटस्‌ॲप वापरताना या जाहिराती नको असतील, तर कंपनीचा ठराविक सबस्क्रिप्शन प्लॅन विकत घ्यावा लागेल. मेटा कंपनी केवळ जाहिराती हटवण्यासाठीच नाही, तर युजर्सना अधिक प्रगत अनुभव देण्यासाठी हे सबस्क्रिप्शन मॉडेल आणत आहे. येत्या काही महिन्यांत फेसबुक, इन्स्टाग्राम आणि व्हॉटस्‌ॲपवर हे नवीन मॉडेल टेस्ट केले जाईल. या पेड सबस्क्रिप्शनमध्ये युजर्सना अत्याधुनिक एआय फिचर्स आणि काही प्रीमियम टूल्स मिळतील, ज्यामुळे त्यांची क्रिएटिव्हिटी आणि कामाची गती वाढवण्यास मदत होईल. विशेषतः कंटेंट क्रिएटर आणि बिझनेस युजर्सना डोळ्यासमोर ठेवून हे बदल केले जात असल्याचे समजते. यामध्ये कंपनीने अलीकडेच २ बिलियन डॉलर्समध्ये खरेदी केलेल्या 'Manru' या एआय एजंटचा देखील समावेश असू शकतो. हा एआय एजंट युजर्सना अवघड कामे अधिक सोप्या पद्धतीने पूर्ण करण्यास मदत करेल.

याशिवाय इन्स्टाग्रामवर अनोनिमस स्टोरी व्ह्यू आणि प्रगत व्हिडीओ एडिटिंग टूल्स सारख्या सुविधा देखील या सबस्क्रिप्शन पॅकेजचा भाग असू शकतात. व्हॉटस्‌ॲप पेड होणार असल्याच्या बातमीमुळे सर्वसामान्यांमध्ये चिंतेचे वातावरण असले तरी, कंपनीने एक मोठा दिलासाही दिला आहे. व्हॉटस्‌ॲपच्या मुख्य आणि मूलभूत सेवा, जसे की मेसेजिंग आणि कॉलिंग, नेहमीप्रमाणे मोफतच राहतील. सबस्क्रिप्शनचा हा प्रयोग केवळ जाहिरातमुक्त अनुभव आणि अतिरिक्त प्रीमियम फिचर्सपुरता मर्यादित असेल. ज्या युजर्सना जाहिरातींनी काही फरक पडत नाही, ते आधीप्रमाणेच विनामूल्य व्हॉटस्‌ॲप वापरू शकतील. मेटा कंपनी या सबस्क्रिप्शनची किंमत किती असेल, याबाबत अजून कोणतीही अधिकृत घोषणा केलेली नाही. सुरुवातीला काही ठराविक देशांमध्ये याची टेस्टिंग केली जाईल आणि तिथल्या युजर्सच्या फीडबॅकनंतरच जागतिक स्तरावर हा बदल लागू केला जाईल. यामुळे आता व्हॉटस्‌ॲपच्या स्टेटस विभागात जाहिराती पाहण्यासाठी तयार राहावे लागणार की पैसे देऊन त्या बंद कराव्या लागणार, हे येणारा काळच ठरवेल.

'ओपन एआय' कडून वैज्ञानिकांसाठी 'प्रिझम' लाँच

आर्टिफिशियल इंटेलिजन्स (एआय) आता केवळ चॅटिंग किंवा कोडिंगपुरते मर्यादित राहिलेले नाही. संशोधनाच्या जगातही 'एआय' वेगाने पाय रोवत आहे. याच पार्श्वभूमीवर, 'ओपन एआय' ने 'प्रिझम' नावाचे एक नवीन वैज्ञानिक वर्कस्पेस लाँच केले आहे. विशेष म्हणजे, ज्यांच्याकडे चॅटजीपीटी खाते आहे, असे सर्व युजर्स याचा मोफत वापर करू शकतील.

'प्रिझम'कडे तुम्ही एक 'स्मार्ट वर्ड प्रोसेसर' म्हणून पाहू शकता. हा केवळ टाईपिंगमध्ये मदत करत नाही, तर स्वतः एका संशोधकाप्रमाणे विचार करण्याची क्षमता ठेवतो. हा टूल 'ओपन एआय' च्या सर्वात आधुनिक GPT-5.2 मॉडेलवर आधारित आहे. उपयोग : स्वतःच्या दाव्यांची पडताळणी करता येईल. संशोधनाची भाषा अधिक प्रगल्भ आणि अचूक करता येईल. जुने संशोधन आणि संदर्भ काही सेकंदात शोधता येतील. हे टूल स्वतः संशोधन करणार नाही, तर शास्त्रज्ञांच्या कामाचा वेग वाढवण्यास मदत करेल. ओपन एआय' च्या माहितीनुसार, त्यांच्या कंज्यूमर उत्पादनांवर (उदा. चॅटजीपीटी) विज्ञानाशी संबंधित कठीण प्रश्नांचे प्रमाण झपाट्याने वाढले आहे. दर आठवड्याला सरासरी ८४ लाख मेसेज प्रगत वैज्ञानिक विषयांवर येतात. जरी यातील किती प्रश्न व्यावसायिक शास्त्रज्ञांचे आहेत हे स्पष्ट नसले, तरी शैक्षणिक जगात 'एआय'चा वापर वाढत असल्याचे हे लक्षण आहे. गणित आणि सांख्यिकी क्षेत्रातही याचे सकारात्मक परिणाम दिसत आहेत. अलीकडेच ऋझढ-५.२ झी च्या मदतीने सांख्यिकी सिद्धांताचे



नवीन पुरावे तयार करण्यात आले आहेत, ज्याची मानवी संशोधकांनीही पुष्टी केली आहे.

'प्रिझम' ची खास वैशिष्ट्ये :

१. LaTeX सपोर्ट : वैज्ञानिक दस्तऐवज लिहिण्यासाठी वापरल्या जाणाऱ्या 'LaTeX' प्रणालीशी हे टूल जोडलेले आहे. यामुळे गणितातील अत्यंत कठीण सूत्रे (Formulas) लिहिणे सोपे होते.

२. डायग्राममध्ये रूपांतर : संशोधक अनेकदा बोर्डवर चित्रे काढून संकल्पना स्पष्ट करतात. 'प्रिझम' आपल्या व्हिज्युअल क्षमतेचा वापर करून या हाताने काढलेल्या चित्रांचे प्रोफेशनल डिजिटल डायग्राममध्ये रूपांतर करू शकतो.

३. प्रोजेक्टचे संपूर्ण आकलन : जेव्हा तुम्ही 'प्रिझम' मध्ये चॅट विंडो उघडता, तेव्हा या 'एआय' ला तुमच्या संपूर्ण प्रोजेक्टची माहिती असते. त्यामुळे तो दिलेली उत्तरे तुमच्या कामाशी संबंधित आणि अत्यंत अचूक असतात.

सर्वात जुन्या लाकडी हत्यारांचा शोध

ग्रीसमध्ये पुरातत्त्वशास्त्रज्ञांनी तब्बल ४ लाख ३० हजार वर्षांपूर्वीची हाताने वापरली जाणारी लाकडी हत्यारे शोधून काढली आहेत. जगात आतापर्यंत अस्तित्वात असलेली ही सर्वात जुनी लाकडी हत्यारे असल्याचे नवीन संशोधनातून समोर आले आहे. दक्षिण ग्रीसमधील पेलोपोनीज द्वीपकल्पावर ही दोन हत्यारे सापडली आहेत. विशेष म्हणजे, ही हत्यारे आधुनिक मानवाच्या (होमो सेपियन्स) उदयापूर्वीच्या एका अज्ञात 'होमिनिन' प्रजातीने तयार केली होती. संशोधकांच्या मते, या शोधामुळे लाकडी हत्यारांच्या वापराचा पुरावा किमान ४०,००० वर्षांनी मागे गेला आहे. 'पीएनएएस' या नियतकालिकात २६ जानेवारी रोजी प्रसिद्ध झालेल्या शोधनिबंधात या हत्यारांचे वर्णन करण्यात आले आहे. मराठुसा येथे सापडलेले पहिले लाकडी साधन सुमारे ३१.९ इंच (८१ सेंमी) लांब आहे. त्याचे एक टोक छिन्नविछिन्न झालेले असून, त्याचा वापर जमिनीतून काहीतरी उकरून काढण्यासाठी केला जात असावा, असा अंदाज आहे. दुसरे साधन केवळ २.२ इंच (५.७ सेंमी) लांब असून, त्याची साल पूर्णपणे काढलेली आहे. याचे एक टोक गोलाकार असून, त्यावर खुणा आहेत. हे साधन कदाचित दगडाची हत्यारे बनवण्यासाठी वापरले जात असावे, असा शास्त्रज्ञांचा तर्क आहे. लाकूड हे सेंद्रिय असल्याने ते लवकर कुजते, मात्र ही हत्यारे ओल्या मातीत गाडली गेली होती. तेथील ऑक्सिजनचे कमी प्रमाण असलेल्या वातावरणामुळे ही हत्यारे आणि इतर सेंद्रिय अवशेष हजारो वर्षे सुरक्षित राहू शकले. या जागेवर हत्ती, पाणघोडे, हरीण आणि रानडुकरांचे अवशेषही सापडले आहेत. त्यावेळचे युरोपमधील हवामान अत्यंत थंड होते, तरीही हा परिसर तलाव आणि पाणथळ जागेने समृद्ध होता. युनिव्हर्सिटी ऑफ रीडिंगच्या पुरातत्त्वशास्त्रज्ञ ॲनेमिक मिल्क्स यांच्या मते, ही जागा त्या काळातील आदिमानवांसाठी राहण्यायोग्य आणि सोयीस्कर होती.



आता फक्त बोलून फोटो एडिट करा!

अनेकदा आपण मित्रांसोबत आवडीने फोटो काढतो, पण कधी फोटो अंधारात येतो तर कधी हात हलल्यामुळे तो धुसर होतो. कधी जास्त सूर्यप्रकाशामुळे फोटो खराब होतो, तर कधी चेहऱ्यावर नको असलेले रिफ्लेक्शन येते. अशा फोटोंमुळे आनंदावर विरजण पडते आणि ते सोशल मीडियावर शेअर करायलाही आपण कचरतो. पण आता चिंता करण्याची गरज नाही, कारण गुगलने आपल्या 'फोटोज' ॲपमध्ये एक क्रांतिकारक बदल केला आहे.

गुगलने भारतातील युजर्ससाठी 'गूगल फोटोज'मध्ये एक नवीन अपडेट आणले आहे. या फिचरचे सर्वात मोठे वैशिष्ट्य म्हणजे आता फोटो एडिट करण्यासाठी तुम्हाला क्लिष्ट सेटिंग्स शोधण्याची गरज नाही. गुगलच्या 'जेमिनी' या एआय मॉडेलमुळे आता तुम्ही फक्त बोलून किंवा मजकूर लिहून फोटोमध्ये काय बदल हवे आहेत, हे सांगू शकता. अँड्रॉइड युजर्सना अनेकदा चांगल्या एडिटिंगसाठी थर्ड-पार्टी ॲप्स डाऊनलोड करावे लागतात, ज्यामुळे डेटा चोरीचा धोका असतो. गुगलने ही समस्या सोडवली आहे. **प्रायव्हसी :** हे फीचर पूर्णपणे सुरक्षित असून युजरच्या गोपनीयतेची काळजी घेते.

नॅचरल लुक्स : एआय तुमच्या गॅलरीतील चेहऱ्यांच्या ग्रुपचा अभ्यास करून एडिटिंग करते, ज्यामुळे फोटोमधील व्यक्तींचे हावभाव नैसर्गिक राहतात. गुगलच्या माहितीनुसार, हे नवीन एआय एडिटिंग फिचर भारतातील अँड्रॉइड युजर्ससाठी उपलब्ध झाले आहे. यासाठी काही अटी आहेत :

रॅम : फोनमध्ये किमान 4 GB रॅम असणे आवश्यक.

व्हर्जन : अँड्रॉइड ८.० किंवा त्यावरील व्हर्जन.

भाषा : हे फिचर इंग्रजीसह मराठी, हिंदी, तमिळ, तेलगू, बंगाली आणि गुजराती अशा भारतीय भाषांमध्ये काम करते. फोटोमध्ये फेरफार केल्याबाबत पारदर्शकता राखण्यासाठी गुगलने 'C2 PA' कंटेंट क्रिडेंशियलचा आधार घेतला आहे. याचा अर्थ असा की, अख द्वारे एडिट केलेल्या प्रत्येक फोटोवर एक कायमस्वरूपी 'डिजिटल लेबल' असेल. यामुळे समोरच्या व्यक्तीला कळू शकेल की हा फोटो मूळ नसून एडिट केलेला आहे.

फोटो एडिट कसा करायचा?

१.**ॲप अपडेट करा :** सर्वप्रथम प्ले-स्टोअरवरून तुमचे Google Photos ॲप अपडेट करा.

२. **फोटो निवडा :** तुम्हाला जो फोटो सुधारायचा आहे, तो ओपन करा.

३.**Edit वर जा :** खाली दिलेल्या 'Edit' पर्यायावर क्लिक करा.


४. **Help me edit :** येथे तुम्हाला 'Help me edit' हा पर्याय दिसेल, त्यावर टॅप करा.

५. **आदेश द्या :** आता माईक बटण दाबून बोलून सांगा (उदा. 'या फोटोचा प्रकाश वाढवा' किंवा 'बॅकग्राउंड बदला').

६. **सेव्ह करा :** काही सेकंदात एआय बदल करेल, त्यानंतर तुम्ही फोटो सेव्ह करू शकता.

स्वादुपिंडाच्या कर्करोगावर 'ट्रिपल-ड्रग्ज थेरपी' यशस्वी

अत्यंत घातक समजल्या जाणाऱ्या स्वादुपिंडाच्या कर्करोगाच्या उपचारात आता एक आशेचा किरण दिसू लागला आहे. संशोधकांनी शोधलेली एक नवीन 'ट्रिपल-ड्रग्ज थेरपी' (तीन औषधांचे मिश्रण) सुरुवातीच्या प्राण्यांवरील चाचण्यांमध्ये यशस्वी ठरली असून, यामुळे या आजाराच्या जगण्याच्या दरात मोठी सुधारणा होण्याची शक्यता निर्माण झाली आहे.स्वादुपिंडाचा कर्करोग हा जगातील सर्वात धोकादायक कर्करोगांपैकी एक मानला जातो. आकडेवारीनुसार : या आजाराचा पाच वर्षांचा सरासरी सर्व्हायव्हल रेट (जगण्याचा दर) केवळ १३% आहे. याचा अर्थ असा की, निदान झालेल्या ८७ टक्के रुग्णांचा पाच वर्षांच्या आत मृत्यू होतो. जर या आजाराचे निदान शेवटच्या टप्प्यात झाले, तर हा जगण्याचा दर केवळ १ टक्का इतका खाली येतो. 'PNAS' या नियतकालिकात प्रसिद्ध झालेल्या अभ्यासानुसार, संशोधकांनी अशा औषधांच्या मिश्रणाची चाचणी केली जी कर्करोग वाढवणाऱ्या तीन मार्गांना एकाच वेळी रोखतात. उंदरांवर केलेल्या या प्रयोगात अत्यंत आशादायक निकाल पाहायला मिळाले.



या संशोधनाचे मुख्य पैलू असे :

प्रभावी उपचार : या थेरपीमुळे केवळ कर्करोगाची वाढच थांबली नाही, तर तो पुन्हा उद्भवण्यापासूनही रोखला गेला.

बिनविषारी : ही थेरपी उंदरांसाठी पूर्णपणे बिनविषारी ठरली असून, त्याचे कोणतेही गंभीर दुष्परिणाम दिसून आले नाहीत.

STAT3 प्रथिनाचा शोध : संशोधनात असे आढळले की, जेव्हा कर्करोग वाढीचे इतर मार्ग रोखले जातात, तेव्हा 'STAT3' नावाचे प्रथिन सक्रिय होऊन कर्करोगाला जिवंत ठेवण्यास मदत करते. नवीन उपचारात या 'बॅकअप' मार्गालाही रोखले जाते. सध्या उपलब्ध असलेली केमोथेरपी शरीरातील वेगाने विभाजित होणाऱ्या सर्वच पेशींवर हल्ला करते, ज्यामुळे शरीराचे मोठ्या प्रमाणावर नुकसान होते. तसेच, कर्करोगाच्या पेशी अनेकदा या उपचारांना दाद न देता वाढण्याचे नवीन मार्ग शोधतात. नवीन 'ट्रिपल थेरपी' या मर्यादांवर मात करण्याचा प्रयत्न करते. 'हे निकाल स्वादुपिंडाच्या कर्करोगाच्या रुग्णांसाठी नवीन क्लिनिकल ट्रायल्स (मानवी चाचण्या) सुरू करण्याचा मार्ग मोकळा करत आहेत,' असे स्पॅनिश नॅशनल कॅन्सर रिसर्च सेंटरच्या वरिष्ठ लेखिका कारमेन गुएरा यांनी सांगितले.

अंतराळात उभारणार 'सॅटेलाईट डेटा सेंटर्स'

जगातील सर्वात श्रीमंत व्यक्ती एलन मस्क आता कृत्रिम बुद्धिमत्ता (एआय) क्षेत्रातील क्रांती थेट अंतराळात नेण्याच्या तयारीत आहेत. मस्क त्यांच्या स्पेसएक्स आणि अख या दोन कंपन्यांचे विलीनीकरण करून अंतराळात 'सॅटेलाईट डेटा सेंटर' प्रस्थापित करण्याची योजना आखत आहेत. गुगल आणि मेटासारख्या बलाढ्य कंपन्यांना एआय शर्यतीत मागे टाकणे, हा यामागचा मुख्य उद्देश आहे.



हे डेटा सेंटर्स म्हणजे अंतराळात फिरणारे शेकडो सॅटेलाईटसब असतील, जे सौरऊर्जेवर चालतील. हे सर्व सॅटेलाईटसब मिळून एक जाळे (नेटवर्क) तयार करतील, जे 'ग्रोक' आणि 'चॅटजीपीटी'सारख्या जड एआय सिस्टिम्स चालवण्यासाठी आवश्यक असलेली प्रचंड शक्ती प्रदान करतील. पृथ्वीवर डेटा सेंटर्स चालवण्यासाठी अफाट वीज लागते. अंतराळात २४ तास मोफत सूर्यप्रकाश उपलब्ध असल्याने विजेचा खर्च वाचेल. डेटा सेंटर्समधील मशिन्स थंड ठेवण्यासाठी पृथ्वीवर खूप पैसा खर्च होतो. अंतराळातील नैसर्गिक वातावरण ही उष्णता शोषून घेते, ज्यामुळे कूलिंगचा खर्च शून्य होतो.

तज्ज्ञांच्या मते, अंतराळात डेटा प्रोसेस करणे केवळ स्वस्तच नाही, तर एआयला अधिक वेगवान आणि कार्यक्षम बनवेल. मस्क यांचे हे स्वप्न पूर्ण होण्यात काही मोठी आव्हानेदेखील आहेत :

अंतराळातील कचरा : फिरणाऱ्या कचऱ्याशी सॅटेलाईटची टक्कर होण्याची भीती.

रेडिएशन : अवकाशातील किरणोत्सर्गापासून नाजूक मशिन्सचे संरक्षण करणे.


दुरुस्ती : मशिन्स खराब झाल्यास अंतराळात जाऊन त्यांची दुरुस्ती करणे अत्यंत कठीण आणि महागडे आहे. डॉयचे बँकच्या अंदाजानुसार, २०२७-२८ पर्यंत केवळ चाचणीसाठी छोटे डेटा सेंटर्स पाठवले जातील. त्यात यश आल्यास २०३० नंतरच मोठ्या स्तरावर हे काम सुरू होईल.

एका अंड्यापासून १२ आम्लेट

साधारणपणे अंड्याचा विषय निघाला की, आपल्या डोळ्यांसमोर कोंबडीचे अंडे येते. पण, तुम्ही कधी विचार केला आहे का, की जर एखादे अंडे फुटबॉलच्या आकाराचे असेल तर? जगात असा एक पक्षी आहे ज्याचे फक्त एक अंडे संपूर्ण कुटुंबाचा नाश्ता तयार करू शकते. त्याच्या एकाच अंड्यापासून बारा लोकांसाठी ऑम्लेट बनू शकते. हे अंडे केवळ आकारानेच मोठे नाही, तर त्याची ताकद आणि वजन जाणूनही लोक थक्क होतात.

जगातील सर्वात मोठा पक्षी असणाऱ्या शहामृगाचे अंडे हे जगातील सर्वात मोठे अंडे असते. या एका अंड्याचे वजन सरासरी १.४ ते २ किलो पर्यंत असते. याची लांबी १५ ते १८ सेंमी आणि रुंदी १२ ते १५ सेंमी असते. कोंबडीचे एक अंडे साधारण ५०-६० ग्रॅमचे असते. म्हणजेच, शहामृगाचे एक अंडे २४ कोंबडीच्या अंड्यांच्या बरोबरीचे असते. जर आपण गणित मांडले, तर एका व्यक्तीसाठी २ ते ३ कोंबडीच्या अंड्यांचे ऑम्लेट लागते. शहामृगाच्या एका अंड्यापासून साधारण १० ते १२ लोकांचे ऑम्लेट आरामात बनू शकते. म्हणजेच एका मोठ्या कुटुंबाचा नाश्ता एकाच अंड्यात पूर्ण होऊ शकतो.

शहामृगाचे अंडे केवळ मोठेच नाही तर पोषक तत्त्वांनीही परिपूर्ण असते. यात सुमारे २००० कॅलरी आणि १०० ते १६८ ग्रॅम प्रोटीन असते. तसेच विटामिन बी१२ आणि फॉलिक ॲसिडचे प्रमाणही भरपूर असते. या अंड्याचे कवच १.५ मिलिमीटर जाड आणि अत्यंत मजबूत असते. हे अंडे फोडण्यासाठी कधीकधी हातोडा किंवा ड्रिल मशिनची गरज भासते. इतक्या मजबुतीमुळेच हे अंडे हाताळणे सोपे नसते. जगातील काही भागांत शहामृगाच्या अंड्यांचा खाण्यासाठी वापर होतो; मात्र भारतात हे अत्यंत दुर्मीळ आहे. याची किंमतही सामान्य अंड्यांच्या तुलनेत खूप जास्त असते. खाण्याव्यतिरिक्त, याच्या मजबूत कवचाचा वापर शोभेच्या वस्तू बनवण्यासाठी किंवा सजावटीसाठीही केला जातो.



९०० दिवसांनी मिटले तोंड!

जरा कल्पना करा, एका १० वर्षांच्या चिमुरडीचे तोंड सलग ९०० दिवस उघडेच राहिले तर? न जेवता येणे, न बोलता येणे आणि सतत होणाऱ्या वेदना... ही कोणत्याही पालकांसाठी काळजाचा थरकाप उडवणारी घटना आहे; पण कोलकाता येथील आर. अहमद डेंटल कॉलेज आणि हॉस्पिटलमधील डॉक्टरांनी एका अत्यंत गुंतागुंतीच्या शस्त्रक्रियेद्वारे या मुलीला पुन्हा हसण्याचे बळ दिले आहे.

या मुलीला 'ॲक्यूट डिसेमिनेटेड एन्सेफलोमायलाईटिस' नावाचा एक अत्यंत दुर्मीळ आजार झाला होता. हा एक 'ऑटोइम्यून न्यूरोलॉजिकल डिसॉर्डर' आहे. यामध्ये शरीराची रोगप्रतिकारक शक्ती चुकून स्वतःच्याच मेंदू आणि मणक्यावर हल्ला करते. यामुळे या मुलीच्या जबड्यावर नियंत्रण ठेवर्णा?या नसा निकामी झाल्या आणि तिचे तोंड बंद करण्याची शक्तीच निघून गेली. मुलीच्या पालकांनी राज्यासह देशातील अनेक रुग्णालयांत उपचार घेतले; पण यश आले नाही. सुमारे अडीच वर्षांहून अधिक काळ तोंड उघडे राहिल्यामुळे अनेक समस्या निर्माण झाल्या होत्या : तोंड सतत कोरडे पडणे. जबड्याचे संतुलन बिघडणे. **सुप्रा-इरप्शन :** दात वरच्या दिशेने अवाजवी वाढणे, ज्यामुळे तोंड बंद करणे अशक्य झाले होते. संसर्गाचा मोठा धोका. आर. अहमद डेंटल कॉलेजमधील तज्ज्ञ डॉक्टरांच्या टीमने एक विशेष मेडिकल बोर्ड स्थापन केला. तपासणीनंतर डॉक्टरांच्या लक्षात आले की, दातांची वाढ इतकी झाली आहे की, ते काढल्याशिवाय जबडा बंद होणे शक्य नाही. नुकतीच ही शस्त्रक्रिया पार पडली असून, मुलीचे मागील बाजूचे दात काढण्यात आले. यामुळे ९०० दिवसांनंतर प्रथमच या मुलीला आपले तोंड बंद करता आले. डॉक्टरांनी सांगितले की, 'इतके दिवस तोंड उघडे राहिल्याने दात जागेवरून हालले होते. संसर्ग टाळण्यासाठी आणि कायमस्वरूपी नुकसान रोखण्यासाठी मागचे दात काढणे हाच एकमेव पर्याय होता. केस 'अत्यंत दुर्मीळ' असल्याचे सांगितले. अशा परिस्थितीत न्यूरोलॉजी आणि डेंटल केअर या दोन्ही तज्ज्ञांची गरज असते. आता ही मुलगी पुन्हा बोलू शकणार आहे आणि स्वतःहाताने जेऊ शकणार आहे.

वनत्रयोदशीला 'दुर्योधनी सत्तेच्या खुर्ची'चे पाय कापून भीमाशंकर-सह्याद्री परिसरातील वृक्षतोडीचा निषेध

हुतात्मा स्मारकात लोकशाहीच्या पंचमहाभूतांचे दीपप्रज्वलन; प्रत्येक अंगणात रेन गेन बॅटरी आणि दोन झाडे लावण्याचे आवाहन

नगर – भीमाशंकर-सह्याद्री परिसरातील वनसंपदेची होत असलेली कथित वृक्षतोड थांबवून पर्यावरणाचे रक्षण करावे, तसेच लोकाभिमुख आणि कर्तव्यनिष्ठ प्रशासन निर्माण व्हावे, या मागणीसाठी पीपल्स हेल्पलाईन आणि भारतीय जनसंसद यांच्या वतीने ६ नोव्हेंबर रोजी अहिल्यानगर येथील हुतात्मा स्मारकात अनोख्या पद्धतीने 'वनत्रयोदशी' साजरी करण्यात आली. यावेळी वृक्षतोडीला जबाबदार असलेल्या सत्ताप्रवृत्तीचा निषेध करण्यासाठी 'दुर्योधनी सत्तेच्या खुर्ची'चे प्रतीकात्मक पाय कापण्यात आले. तसेच लोकशाहीच्या पंचमहाभूतांचे प्रतीक असलेल्या पाच पणत्यांचे दीपप्रज्वलन करून पर्यावरण संवर्धनाचा संदेश देण्यात आला. प्रत्येक घराच्या अंगणात पावसाचे पाणी जमिनीत मुरविण्यासाठी एक 'रेन गेन बॅटरी' आणि किमान दोन झाडे लावून 'हरित श्रीमंत भारत' घडविण्याचा देशव्यापी संकल्प यावेळी करण्यात आला.



पीपल्स हेल्पलाईन आणि भारतीय जनसंसद यांच्या वतीने हुतात्मा स्मारकात अनोख्या पद्धतीने 'वनत्रयोदशी' साजरी करण्यात आली.

या आंदोलनात ॲड. कारभारी गवळी, वीरबहादूर प्रजापती, अशोक सब्बन, राहुल आढाव, विठ्ठल ठुबे, शाहीर कान्हू सुंबे, पोपट भोसले, आनंदा आढाव, बाळासाहेब पालवे, अशोक भोसले, आसाराम सातपुते, नंदा कुलट, आसाराम बर्डे, विलास बर्डे, हिरामन गायकवाड, बबलू खोसला, दत्तात्रय साबळे आदी सहभागी झाले होते.

कार्यक्रमाच्या प्रारंभी उपस्थित सामाजिक कार्यकर्त्यांनी हुतात्मा स्मारकाला पुष्पांजली अर्पण करून देशासाठी बलिदान दिलेल्या हुतात्म्यांना अभिवादन केले. त्यानंतर लोकभक्ती, ज्ञानभक्ती, कर्मभक्ती, संवैधानिक नैतिकता आणि कायद्याचे राज्य या लोकशाहीच्या पाच मूलभूत मूल्यांचे प्रतीक म्हणून पाच पणत्या प्रज्वलित करण्यात आल्या. लोकशाही ही केवळ सत्तेची व्यवस्था नसून ती जनतेप्रती असलेली जबाबदारी आणि नैतिकतेवर आधारित असली पाहिजे. शासनकर्ते आणि प्रशासनातील प्रत्येक घटकाने या मूल्यांच्या प्रकाशात काम करावे, असा संदेश यावेळी देण्यात आला.

भीमाशंकर-सह्याद्री परिसरातील जलविद्युत प्रकल्पासाठी सुमारे ३०० वर्षे जुन्या वृक्षांसह हजारो झाडांची तोड झाल्याचा आरोप आयोजकांनी केला. वनसंपदा आणि जैवविविधतेचा नाश करणाऱ्या या वृक्षतोडीला जबाबदार असलेल्या सत्ताप्रवृत्तीचा निषेध करण्यासाठी 'दुर्योधनी सत्तेची खुर्ची' हे प्रतीक उभारण्यात आले होते. या खुर्चीचे प्रतीकात्मक पाय कापून सत्तेच्या अहंकाराचा आणि पर्यावरणविरोधी निर्णयप्रक्रियेचा निषेध नोंदविण्यात आला.

यावेळी 'दुर्योधन-त्रयोदशीला डिच्चू फत्ते!', 'वृक्षतोड थांबवा, सह्याद्री वाचवा!' आणि 'भीमाशंकर सत्याग्रहाचा विजय असो!' अशा घोषणांनी परिसर दुमदुमून गेला. जंगलांचे अस्तित्व टिकले तरच पाणी, माती, वन्यजीव आणि मानवी जीवनाचे भवितव्य सुरक्षित राहील. त्यामुळे विकासाच्या नावाखाली निसर्गसंपत्तीचा विनाश होऊ नये, अशी भूमिका कार्यकर्त्यांनी मांडली.

सार्वजनिक जीवनात कायदेशीर कर्तव्ये आणि प्रशासकीय जबाबदाऱ्या पार पाडण्यात कसूर करणाऱ्या राजकीय सत्ताधाऱ्यांना आणि प्रशासकीय अधिकाऱ्यांना उद्देशून 'तुकाराम मुंढे यांच्या नखांची दिवाळी भेट' हा प्रतीकात्मक उपक्रमही राबविण्यात आला. कर्तव्यनिष्ठ अधिकारी म्हणून ओळखल्या जाणाऱ्या तुकाराम मुंढे यांच्या कार्यपद्धतीचे नखाएवढे तरी अनुकरण करून प्रत्येक अधिकारी आणि लोकप्रतिनिधीने जनतेप्रती असलेली जबाबदारी प्रामाणिकपणे पार पाडावी, हा या उपक्रमामागील संदेश असल्याचे आयोजकांनी स्पष्ट केले. हा संदेश देशभर पोहोचविण्याचा निर्धारही यावेळी व्यक्त करण्यात आला.

वनत्रयोदशीचे औचित्य साधून उपस्थित कार्यकर्त्यांनी झाडांना पाणी घालून वृक्षपूजन केले. केवळ वृक्षारोपण करून थांबण्याऐवजी लावलेल्या प्रत्येक झाडाचे संगोपन करणे ही प्रत्येक नागरिकाची जबाबदारी आहे, असे आवाहन करण्यात आले. पावसाचे पाणी वाहून जाण्यापासून रोखून ते जमिनीत मुरविण्यासाठी प्रत्येक घराच्या अंगणात एक 'रेन गेन बॅटरी' उभारावी. त्याचबरोबर किमान दोन झाडे, शक्यतो फळझाडे लावून त्यांची नियमित निगा राखावी, असा देशव्यापी संकल्प जाहीर करण्यात आला.

पाणी, माती, वनस्पती आणि सजीवसृष्टी यांचे परस्परांशी असलेले नाते जपल्याशिवाय पर्यावरणाचा समतोल राखणे शक्य नाही. पावसाचे पाणी जमिनीत मुरविणे, भूजलपातळी वाढविणे आणि वृक्षसंपदा जतन करणे या तीन गोष्टी प्रत्येक कुटुंबाने आपल्या जीवनशैलीचा भाग बनवाव्यात. यातूनच पर्यावरणीय समृद्धीबरोबर आर्थिक आणि सामाजिक समृद्धी साधता येईल, असे मत ॲड. कारभारी गवळी यांनी व्यक्त केले. 'घराघरांत आणि जगभरात वनत्रयोदशी!' आणि 'हरित श्रीमंत भारत घडवूया!' या घोषणांमधून पर्यावरण संवर्धनाचा विचार जनसामान्यांपर्यंत पोहोचविण्याचा निर्धार करण्यात आला. कार्यक्रमाच्या शेवटी उपस्थित कार्यकर्त्यांना दिवाळीनिमित्त लाडू आणि चिवड्याचे वाटप करण्यात आले.

गुरुवाणी - १०३
लाईक, डिसलाईक...

एखाद्या गोष्टीची सवय लागते कारण व्यक्तीने आधी ती ग्रहण केलेली असते. ग्रहण आनंदातही असते आणि डिसलाईक करणेही ग्रहणच असते. आपण एकदा लाईक किंवा डिसलाईक करणे सुरू केले की पुढची प्रक्रिया सुरू होते. लाईक केले की शरीरात डोपामाईन तयार होते आणि नंतर ते अजून मागितले जाते. डिसलाईक केले की शरीरात टॉक्सिन तयार होण्यास सुरुवात होते. मोबाईलची सवय लागली की तो दूर ठेवणे अवघड होते. मोबाईल स्क्रीनची लाईट डोळ्यांसाठी धोकादायक असते. लहान मुलांमध्ये सध्या दृष्टीदोष वाढत आहे. लाईक किंवा डिसलाईक वाढले की अनर्थ होतोच. दारू, जुगार, मोबाईलचे व्यसन जडले तर शेवट वाईटच होतो हे कळते. पण ते सुटत नाही. कारण ते व्यसन कितीही केले तरी तृप्ती होत नाही. खाण्याचे किंवा जगण्याचे

पथ्य पाळले तर समाधीने शांत मृत्यू येईल पण अपथ्य केले तर व्याधीने मृत्यू होईल. परमात्मा सांगतात, व्यसन लागायला वस्तू जबाबदार नसते तर व्यक्तीची मानसिकता जबाबदार असते. पाच इंद्रियांबरोबर परमात्मा मनाविषयी भाष्य करतात. मन का बेचैन होते? निगेटिव्ह विचार का येतात? मनासारखे नाही झाले की व्यक्ती अस्वस्थ होतो. परमात्मा सांगतात, कोणतीही परिस्थिती चांगली किंवा वाईट नसते. केवळ आपल्या टिट्युडमुळे आपण आनंदी किंवा दुःखी होतो. कोणीही लगेच राग द्वेष मुक्त होऊ शकत नाही. पण त्याचे गुलाम व्हायचे नाही. आजच्या काळात ब्युटी प्रॉडक्ट तयार करताना खूप हिंसा केली जाते आणि हेच प्रॉडक्ट सगळ्यांना आवडतात. आवडणे , नावडणे स्वाभाविक असले तरी त्याच्या किती आहारी जायचे हे आपल्यालाच ठरवायचे असते. स्वतःच्या जीवनात स्वतःचे मालक बनून जगता आले पाहिजे. जैन दर्शनने जगाला कर्म विज्ञान दिले आहे. आपण कर्म बांधणे सुरू करतो आणि नंतर ते आपल्याला बांधतात. आकाशात असंख्य परमाणु कण आहेत. ते एकत्र करून ग्रहण केले की बंध बनतो. सगळ्यात जास्त आयुष्य मनातील भ्रमाचे असते. भ्रम लवकर जात नाही. जसजसे भ्रम कमी होतात तसतसे कर्म बंध कमी होतात. फक्त हे भ्रम दूर करण्यासाठी स्वतःलाच प्रयत्न करावे लागतात. तुमच्या डोळ्याची शस्त्रक्रिया दुसरा करेल पण तुमच्या टिट्युडची शस्त्रक्रिया दुसरा कोणी करू शकत नाही. क्वालिटी आणि क्वांटिटीवरही काम केले पाहिजे. साखरेची क्वालिटी चहा गोड करते पण साखरेची क्वांटिटी सुद्धा योग्य प्रमाणातच लागते. हे सगळे ज्ञान दर्शन भगवान महावीरांची भक्ती केल्याने होते.

– उपाध्याय प्रवर पू. श्री. प्रविणऋषिजी म. सा.

अहिल्यानगर शहरामध्ये १२ ते १८ नोव्हेंबर दरम्यान शिवमहापुराण कथा सप्ताहाचे आयोजन

११ हजार पंचमुखी रुद्राक्षांचे वाटप; दररोज भाविकांसाठी महाप्रसादाची व्यवस्था

नगर – अहिल्यानगर शहरात १२ ते १८ नोव्हेंबरदरम्यान श्री शिवमहापुराण कथा सप्ताहाचे आयोजन करण्यात आले आहे. श्री सिद्धेश्वर महादेव मंदिर आणि श्री साई द्वारका सेवा ट्रस्ट यांच्या संयुक्त विद्यमाने हा सातदिवसीय आध्यात्मिक सोहळा आयोजित करण्यात आला आहे. दिल्लीगेट परिसरातील सातभाई मळा येथील डी.एड. कॉलेज मैदानावर दररोज सायंकाळी ६ ते रात्री ९ या वेळेत शिवमहापुराण कथेचे निरूपण होणार आहे. श्रीरामकृष्ण परमहंस सेवा प्रतिष्ठान, केज (जि. बीड) येथील कथाप्रवक्ते ह.भ.प. समाधानजी महाराज शर्मा आपल्या रसाळ वाणीतून शिवमहापुराणाचे निरूपण करणार आहेत.



ॲड. धनंजय जाधव समाधान महाराज शर्मा

या आध्यात्मिक सोहळ्यात भाविकांना ११ हजार पंचमुखी रुद्राक्षांचे वाटप करण्यात येणार आहे. तसेच दररोज कथा संपल्यानंतर सर्व भाविकांसाठी महाप्रसादाची व्यवस्था करण्यात आली आहे.

सध्याच्या बदलत्या काळात तरुण पिढीवर धार्मिक, सांस्कृतिक आणि नैतिक संस्कार होण्याची आवश्यकता आहे. भगवान शिव यांच्या शिकवणीतील जीवनमूल्ये, भक्ती, श्रद्धा आणि भारतीय संस्कृतीतील संस्कारांचा वारसा पुढील पिढीपर्यंत पोहोचविणे, हा या आयोजनामागील प्रमुख उद्देश आहे. केवळ भौतिक संपत्ती न देता मुलांना संस्कारांची शिदोरी देणेही तितकेच महत्त्वाचे आहे, या विचारातून या कथा सप्ताहाचे आयोजन करण्यात आले आहे.

कार्यक्रमाचे निमंत्रक तथा उपमहापौर आणि श्री साई द्वारका सेवा ट्रस्टचे अध्यक्ष धनंजय जाधव यांनी अहिल्यानगर शहरासह परिसरातील भाविकांनी आपल्या कुटुंबीयांसह उपस्थित राहून या आध्यात्मिक सोहळ्याचा लाभ घ्यावा, असे आवाहन केले आहे.

शिवमहापुराण कथा सप्ताहाचे नियोजन

१२ नोव्हेंबर : शिवपुराण महात्म्य, विद्येश्वर संहिता. १३ नोव्हेंबर : रुद्र संहिता, सती-पार्वती खंड, शिव-पार्वती विवाह. १४ नोव्हेंबर : रुद्र संहिता, कुमार खंड, गणेश व कार्तिकेय चरित्र. १५ नोव्हेंबर : रुद्र संहिता, शुद्ध खंड, अर्धनारी नटेश्वर, नंदी वर्णन. १६ नोव्हेंबर : उमा संहिता, कैलास संहिता. १७ नोव्हेंबर : बारा ज्योतिर्लिंग महात्म्य. १८ नोव्हेंबर : शिवमानस पूजा विधी, पंचाक्षर मंत्राची महिमा आणि कथा समापन. या सात दिवसीय शिवमहापुराण कथा सप्ताहाचे आयोजन श्री सिद्धेश्वर महादेव मंदिर आणि श्री साई द्वारका सेवा ट्रस्ट, अहिल्यानगर यांच्या वतीने करण्यात आले आहे.



कोतवाली, तोफखाना व भिंगार कॅम्प पोलीस स्टेशन हद्दीतून हरवलेले वा चोरीस गेलेले १८ लाख ८५ हजार रूपये किंमतीचे ८७ मोबाईल पोलिसांनी शोधून परत केले.

पोलिसांनी १९ लाखांचे मोबाईल केले परत

नगर – कोतवाली, तोफखाना व भिंगार कॅम्प पोलीस स्टेशन हद्दीतून हरवलेले वा चोरीस गेलेले १८ लाख ८५ हजार रूपये किंमतीचे ८७ मोबाईल पोलिसांनी शोधून परत केले. यात कोतवाली पोलीस स्टेशन हद्दीतील १४ लाख रूपयांचे ५४, तोफखाना हद्दीतील ४ लाख रूपये किमतीचे २५ तर, भिंगार कॅम्प पोलीस स्टेशन हद्दीतील ८५ हजार रूपये किंमतीच्या ८ मोबाईलचा समावेश आहे.

ही कारवाई जिल्हा पोलिस अधिक्षक मुम्मका सुदर्शन, अपर पोलीस अधीक्षक वैभव कलुबर्मे, उपविभागीय पोलीस अधिकारी दिलीप टिपरसे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक नितीन देशमुख, पोलिस निरीक्षक बालाजी वैद्य, सहाय्यक पोलीस निरीक्षक तेजश्री थोरात, पो. कॉ. सचिन बाचकर व पो. कॉ. संदीप थोरात यांनी केली. ज्या नागरिकांचे हरवलेले वा चोरीला गेलेले मोबाईल परत मिळाले त्यांनी आनंद व्यक्त केला असून दिवाळी सणाची पोलीस विभागाने दिलेली ही गोड भेट असल्याची प्रतिक्रिया व्यक्त केली.

प्रत्येक हिंदूंच्या जीवनात गो पुजानाला खूप महत्व

आ.संग्राम जगताप यांचे प्रतिपादन; नव्या जागी स्थलांतरित अरुणोदय गो शाळेत गोवत्स पूजन

नगर – गो मातेच्या पवित्र पूजनाने दिवाळीच्या सणाला आजपासून प्रारंभ झाला आहे. ३३ कोटी देवांचे वास्तव्य गो मातेमध्ये असल्याने प्रत्येक हिंदूंच्या जीवनात गो पुजानाला खूप महत्व आहे. युगपुरुष छत्रपती शिवाजी महाराजांनी सुरु केलेले हा गो पूजनाचा वारसा आजही आपण पुढे चालवत आहोत. गेल्या अनेक वर्षांपासून अरुणोदय गो शाळेच्या माध्यमातून उत्कृष्ट गो संवर्धनासह पालनपोषण होत आहे. अनेक दानशूरांच्या मदतीने अरुणोदय गो शाळेचे प्रशस्त जागेत स्थलांतर करून गाईंसाठी अधिक चांगल्या सुविधा उपलब्ध झाल्या आहेत. वसुबारस निमित्त न्यू संकल्प स्मार्ट सखी ग्रुपच्या माध्यमातून येथे गोपूजन व विविध स्पर्धा घेण्यात आल्या आहे, त्यास महिलांनी प्रतिसाद दिला आहे. भविष्यात ही गोशाला गो संवर्धन कार्याला दिशादर्शक ठरेल, असा विश्वास आ.संग्राम जगताप यांनी व्यक्त केला.



वसुबारस निमित्त स्थलांतरित झालेल्या अरुणोदय गो शाळेत गो पुजन करताना आ.संग्राम जगताप व उद्योजक नरेंद्र फिरोदिया.

अरुणोदय गो शाळेचे वारुळाचा मारुती रस्त्यावरील नव्या जागेत स्थलांतर झाले आहे. वसुबारस निमित्त गोवत्स पुजानाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी आ.संग्राम जगताप, उद्योजक नरेंद्र फिरोदिया यांच्या हस्ते मंत्रोच्चारात गो पूजन झाले. यावेळी महापौर ज्योती गाडे, अशोक पितळे, गो शाळेचे व्यवस्थापक मनीष फुलडहाळे यांच्यासह देणगीदार, महायुतीचे नगरसेवक व पदाधिकारी, विविध क्षेत्रातील नागरिक महिला उपस्थित होते. गो पूजन करण्यासाठी महिलांनी गर्दी केली होती.

यावेळी नरेंद्र फिरोदिया म्हणाले, अरुणोदय गो शाळेत उत्कृष्ट काम होत आहे. येथील गो सेवा व संवार्धांच्या कार्याला सर्वांनी कर्तव्याच्या भावनेने सहकार्य करावे, असे आवाहन केले.

प्रास्ताविकात मनीष फुलडहाळे यांनी गो शाळेची माहिती देऊन येथे सुमारे ३७० देशी गाईंचे संवर्धन होत असल्याचे सांगितले.

न्यू संकल्प स्मार्ट सखी ग्रुपच्या वतीने महिलांसाठी पारंपरिक उत्कृष्ट वेशभूषा व आरती थाळी सजावट स्पर्धेचे आयोजन करण्यात आले.

यावेळी ग्रुपच्या वैशाली चोपडा, मोनिका मेहता, स्मिता बोरा, सारिका गांधी, सोना भंडारी यांनी स्पर्धेचे नियोजन केले. यावेळी श्रीमती पार्वती सभापती सुभाष लोंढे, उद्योजक राजेश भंडारी, विलास कटारिया, आशिष पोखरणा, चेतन बळगट, मयूर कटारिया, विशाल पवार, संभाजी पवार, मंगेश खताळ, वैभव ढाकणे, मयूर कुलथे, नरेंद्र बाफना, डॉ. हर्षवर्धन तंवर, निर्मल मुथा, जनक अहुजा, राजेंद्र छल्लानी, सत्यान गुंदेचा, संपत बारस्कर, अनिल मोहिते, सुजय मोहिते, प्रकाश भागानगरे, विपुल शेटीया, विकी जगताप, अजित जगताप, नगरसेविका पौर्णिमा गव्हाळे, वर्षा काकडे, गीतांजली काळे, मयुरी जाधव, सविता कांबळे, मोहित पंजाबी, महेश तवले, दत्ता गाडळकर, अलका मुंडाळा, हिंद सेवा मंडळाचे सचिव सुमतीलाल कोठारी, निर्मला भंडारी, कमल कोतकर, सुनिता गेनप्पा, अभय श्रीश्रीमाळ, अरविंद शिंदे, विलास कटारिया, मनोज कोतकर आदींसह विविध क्षेत्रातील नागरिक उपस्थित होते.

यावेळी गायक गिरीराज जाधव यांच्या भक्ती गीतांच्या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

सूत्रसंचालन प्रसन्न पाठक यांनी केले.

आरोपीस चेकसंदर्भात दिलेली तुरुंगवासाची व दंडाची मोठी शिक्षा अपीलीय कोर्टामध्ये कायम


नगर – अहमदनगर येथील व्यापारी शांती लॉटरी एजन्सीचे चालक (अर्बन बँक रोड, कापडबाजार व रा. आगरकर मळा, शिवनेरी मार्ग, स्टेशन रोड, अहमदनगर) अनिल बाबुलाल कटारिया यांनी रा. शेंडी पोखर्डी येथील भिशीचालक शिवाजी भानुदास चौरे यास त्याचे आर्थिक अडचणीचे कारणास्तव केवळ त्यास मदत करण्याच्या उद्देशाने फार मोठी रक्कम हातउसणवार दिलेली होती. सदर रक्कमेच्या व्यवहारापोटी सदर आरोपी शिवाजी चौरे याने फिर्यादी अनिल कटारिया यांना कायदेशीर नोटरी दस्त करून देऊन तो दस्त शासकिय नोटरी पब्लिक ऑफिसर यांचेसमोर रितसर नोंदवून देऊन सदर रक्कमेच्या परतफेडीपोटी दोन मोठ्या वेगवेगळ्या तारखेचे व रक्कमेचे दिलेले धनादेश सदर आरोपी याने जाणिवपुर्वक न वटविल्याने फिर्यादी यांनी सदर आरोपी यांचे विरुद्ध न वटलेल्या दोन्ही चेकबाबत एन.आय.ॲक्टचे कलम १३८ अंतर्गत दोन फौजदारी केसेस अहमदनगर न्यायालयामध्ये दाखल केल्या असता सदरच्या दोन्ही प्रकरणामध्ये आरोपीस एकंदरीत ३१- महिन्याचे मोठ्या कारावासाचे कालावधीची शिक्षा ठोठावलेली होती त्या शिक्षेविरुद्ध सदर आरोपी शिवाजी चौरे याने जिल्हा न्यायालयामध्ये दोन अपीले दाखल केलेली होती व सदर अपीलामध्ये सदर आरोपीने अनेक विविध व बेकायदेशीर बचाव घेतलेले होते मात्र सेशन कोर्टाने आरोपीचे सर्व बेकायदेशीर बचाव पुर्णपणे निरर्थक व तथ्यहिन ठरवून खालील कोर्टाने आरोपीस दिलेली तुरुंगवासाची व दंडाची शिक्षा नुकतीच कायम करून सदर आरोपीने दाखल केलेली दोन्ही अपीले सेशन कोर्टाने (जिल्हा कोर्ट क्र.१ श्री. गुप्ता) नुकतीच रद्द केलेली आहेत.

सदर आरोपी शिवाजी भानुदास चौरे याचेतर्फे ॲड. बी. एम. झगडे यांनी कोर्ट कामकाज पाहिले असुन सदर अपेलंट अनिल कटारिया यांचेतर्फे जेष्ठ विधीज्ञ एस. पी. भारदे, ॲड. एन. एम. हराळे, ॲड. वैभव लोंढे व ॲड. अक्षय नजन यांनी कोर्ट कामकाज पाहिलेले आहे.

महसूल कर्मचाऱ्यांच्या त्रासाला कंटाळून शेतकऱ्याचे आमरण उपोषण

जमीन व्यवहारात पाच लाखांची मागणी, दमदाटी व फॉरेस्ट वर्ग-२ जमिनीच्या बेकायदा खरेदीचे आरोप

नगर – जमीन व्यवहारातील कथित फसवणूक, लाचखोरी तसेच महसूल विभागातील कर्मचाऱ्यांकडून होत असलेल्या त्रासाला कंटाळून पाथर्डी तालुक्यातील कुत्तरवाडी येथील शेतकरी अंबादास दादाबा गायकवाड यांनी इतर १५ व्यक्तींसह जिल्हाधिकारी कार्यालयासमोर आमरण उपोषण सुरू केले आहे. आपल्या विविध मागण्यांवर तातडीने कारवाई करावी, अशी मागणी त्यांनी जिल्हाधिकाऱ्यांकडे निवेदनाद्वारे केली आहे.



या उपोषणात शेतकरी अंबादास दादाबा गायकवाड यांच्यासह वसंत खेडकर, बाबुराव खेडकर, केशव खेडकर, विष्णू खेडकर, देविदास खेडकर आदींसह कुटुंबातील महिला शेतकरी सहभागी झाल्या आहेत.

निवेदनात नमूद केल्यानुसार, कुत्तरवाडी येथील जुना सर्व्हे क्रमांक २२६ आणि नवीन सर्व्हे क्रमांक ६६/१/अ/१ मधील जमिनीवर अर्जदार गेल्या ५५ वर्षांपासून वहीत करीत आहेत. सदर जमीन अर्जदारांना देण्याबाबत तहसीलदार आणि प्रांताधिकाऱ्यांनी लेखी आदेश दिले असल्याचा दावा करण्यात आला आहे. मात्र, महसूल विभागातील क्लार्क यांनी जमीन देण्यासाठी पाच लाख रुपयांची मागणी केल्याचा आरोप निवेदनात करण्यात आला आहे. तसेच अन्य व्यक्तींना सोबत घेऊन दमदाटी केल्याचेही अर्जदारांनी म्हटले आहे.

याशिवाय, रस्त्यात अडवून अपमानास्पद तसेच जातिवाचक शब्दांचा वापर करण्यात आल्याचा आरोप करण्यात आला आहे. या घटनांमुळे झालेल्या मानसिक त्रासातून पत्नीला तीव्र मानसिक धक्का बसला आणि त्यानंतर हृदयविकाराच्या झटक्याने तिचा मृत्यू झाल्याचा दुर्दैवी दावा अंबादास गायकवाड यांनी निवेदनात केला आहे.

फॉरेस्ट वर्ग-२ जमिनीच्या खरेदीचा मुद्दाही ऐरणीवर

कुत्तरवाडी शिवारातील दलित व मातंग समाजातील नागरिकांना मिळालेल्या फॉरेस्ट वर्ग-२ जमिनींच्या खरेदी-विक्रीचा मुद्दाही निवेदनात उपस्थित करण्यात आला आहे. जमिनींची नियमांचे उल्लंघन करून खरेदी करण्यात आल्याचा आरोप करत संबंधित खरेदी व्यवहार रद्द करण्याची मागणी करण्यात आली आहे. यासंदर्भात मंडळ अधिकारी आणि तहसीलदार यांनी अहवाल पाठविला असल्याचे सांगण्यात आले; मात्र अद्याप ठोस कारवाई झालेली नसल्याची तक्रार अर्जदारांनी केली आहे.

संबंधित जमीन व्यवहारांची निष्पक्ष चौकशी करून दोषींवर कारवाई करावी, कथित लाचखोरी व दमदाटीच्या आरोपांची सखोल तपासणी करावी आणि फॉरेस्ट वर्ग-२ जमिनीच्या व्यवहारांबाबत योग्य तो निर्णय घ्यावा, अशा मागण्या उपोषणकर्त्यांनी केल्या आहेत.

प्रशासनाने या प्रकरणाची गांभीर्याने दखल घेऊन तातडीने न्याय द्यावा, अन्यथा आंदोलन अधिक तीव्र करण्यात येईल, असा इशाराही उपोषणकर्त्यांनी दिला आहे.

३७ वे पुण्यस्मरण



स्व. लछमनदास राठोड

जन्म १९०३ स्व.धनत्रयोदशी १९८९

जगण्याचे बळ, कुटूंबाचा पाया,
आधाराची छाया माझ्यावरी...
स्मृतींचा दरवळ, चंदनाची काया,
माऊलीची माया गोदावरी...

आपल्या प्रेमळ स्मृतीस भावपूर्ण आदरांजली....!

दु:खांकित

राठोड परिवार
न्यू प्रभात बेकर्स
ॲण्ड फूड प्रॉडक्टस्
सावेडी,अहिल्यानगर, 98220 07740

त्वरित पाहिजे

दुकानात कामासाठी कॉम्प्युटर व टॅलीचे पूर्ण अनुभव असलेला

मुलगा त्वरित पाहिजे

(पुर्णवेळ स. १०.३० ते रा. १०.३०)

8669912372

फ्लेक्स प्रिंटींग

9403232323

1RK भाड्याने देणे आहे

फुलारगल्ली, माळीवाडा अहिल्यानगर

9960230553

विकणे/भाड्याने देणे

सारसनगर येथे नवीन
3BHK
बंगला विकणे आहे

2BHK
फ्लॅट भाड्याने आहे

9604914748

पाहिजेत

वॉर्डबॉय -४ हॉस्पिटलमध्ये काम केल्याचा अनुभव आवश्यक

आकर्षक पगार, अर्जासह समक्ष भेटावे.

9028240404

विकणे आहे

2BHK

८३० स्क्वे. फुट

नवीन बांधकाम चालू
फस्ट फ्लोअरवर, रोडटच, २४ तास पाणी, लिफ्टची सोय, पार्किंगची सुविधा,
अक्षता गणपतीसमोर, गुजरगल्ली

9823034435

महाराष्ट्रातील सर्वात खस्त कापड मॉल महावीर मॉल

स्वस्त म्हणजे नक्की काय असतें..?



लहान मुलांचे 1 वर्ष ते 16 वर्षा पर्यंतचे इंडो वेस्टर्ण ड्रेस, शेरवानी, जॅकेट सूट, ब्लेझर, इंपोर्टेड कार्गो पॅन्ट, अरमानी पॅन्ट, इंपोर्टेड शर्ट, कार्गो शर्ट, इंपोर्टेड टी.शर्ट अशी फॅन्सी आणि ब्रँडेड फेस्टिवल रेंज जी कुठेही पहायला मिळणार नाही आणि तेही सर्व चॅलेंज रेट मध्ये. ₹ 299 /- पासून ते ₹ 1999/- रु. पर्यंत ची भव्य रेंज.

मार्केट पेक्षा वेगळं पाहिजे तर मार्केट पेक्षा वेगळ्या ठिकाणी यावे लागेल.

अधिक माहितीसाठी भेट द्या..

श्री महावीर कलेक्शन

मारुती मंदिरा समोर, मर्चंट बँके जवळ, मार्केटयार्ड, अ.नगर. Mo. 98222 52001

जैन सोशल फेडरेशन संचलित वर्धमान महावीर कॉलेज ऑफ नर्सिंग, अहिल्यानगर

Govt of Maharashtra | MUHS Nashik | Maharashtra Nursing Council

INSTITUTE LEVEL ROUND 2026-27 B.Sc. Nursing अभ्यासक्रमासाठी संस्थास्तर फेरीचे वेळापत्रक

अ. क्र.	तपशील	दिनांक/कालावधी
1	संस्थेतील जागा वाटप व पात्र उमेदवारांची यादी प्रसिद्ध करणे	०७/११/२०२६
2	पात्र इच्छुक उमेदवारांनी निर्धारित नमुन्यात अर्ज सादर करणे	०८/११/२०२६ ते १०/११/२०२६ (सायं ५.३० वाजेपर्यंत)
3	सर्वसाधारण गुणवत्ता यादी व प्रवर्गनिहाय यादी (Selection List-1) प्रसिध्द करणे	१०/११/२०२६ (सायं ६.३० वाजेपर्यंत)
4	(Selection List-1) दुसार उमेदवारांचा प्रवेश व कागदपत्र पडताळणी	११/११/२०२६ ते १२/११/२०२६ (सायं ५.३० वाजेपर्यंत)
5	Selection List-2 (प्रतिक्षा यादी) प्रसिध्द करणे	१२/११/२०२६ (सायं.६.३० पर्यंत)
6	Selection List-2 दुसार प्रवेश व कागदपत्र पडताळणी	१३/११/२०२६ ते १४/११/२०२६ (सायं.५.३० पर्यंत)
7	उर्वरित रिक्त जागांची (Residual Vacancy) सूचना प्रसिध्दकरणे	१४/११/२०२६ (सायं.६.३० पर्यंत)
8	उर्वरित जागांसाठी पात्र उमेदवारांचा प्रवेश (मुळ कागदपत्रांसह)	१५/११/२०२६ (दु.२ पर्यंत)
9	उर्वरित जागा भरणे (मेरिटनुसार)	१५/११/२०२६ (दु.३ पासून)
10	प्रवेशित उमेदवारांची माहिती (College Feedback Module)	१५/११/२०२६
11	(College Feedback Module) प्रवेशासाठी अंतिम दिनांक (INC नुसार)	१५/११/२०२६

सुधारित पात्रता परसेंटाईल निकष / Revised Eligibility Percentile Criteria

पात्रता वर्ग	परसेंटाईल निकष (%)
खुला	०
खुला दिव्यांग	०
राखीव आणि राखीव दिव्यांग	०

Campus: 152/2 Nagar-Kalyan Road, Ganesh Nagar, Nalegaon, Ahilyanagar - 414001 | Mo: 7385502484
9527335317 | 02412971421 | Website: www.vmcn.edu.in



व्हा स्मार्ट ग्राहक

दररोज एक स्मार्टफोन जिंकण्याची संधी

पिढ्यानपिढ्या चालत आलेल्या संपूर्ण परिवाराचे हक्काचे सुवर्ण दालन खास दिवाळी निमित्त घेऊन येत आहे दररोज एक स्मार्ट फोन जिंकण्याची सुवर्ण संधी



स्थापना 1937 S.G.K. ज्वेलर्स, अहिल्यानगर

सत्यम् शिवम् सौंदर्यम्
एस.जी.कायगांवकर®
सुवर्ण क्षणांसाठी

सराफ बाजार 9890032323 | सावेडी 9511902345

सावेडीत प्रशस्त पार्किंग | कॉर्पोरेट गिफ्ट व्हाऊचर | follow us on www.sgkaigaonkar.com

दिवाळी महासेल..

स्टॉक असेपर्यंत...

महिलांसाठी : साडी, कुर्ती, लेगीन्स, वन पीस,ब्लाऊज भारी, टॉप, लोवर — रु.२००/-ला काहीही १ व रु.५०० ला ३

लेडीज : स्मॉल ते XL टू पीस, कॉर्ड सेट, नाईट ड्रेस — रु.२५०/-

टू पीस 3XL ते 6xL — रु.३००/-

* लहान मुला-मुलींचे ड्रेस रु. २०० पासून पुढे
* लहान व मोठ्या मुलींचे भारी कपडे रु.३०० पासून पुढे

* बेडशीट+पिलो कव्हर
100 x 100 चे ८०० चे रु.४००/-
108 x 108 चे रु.१२०० चे रु.५००/-
वेळ : दुपारी १२ रात्री ८ वाजेपर्यंत
* ब्रॅण्डेड लेडीज २ पीस थ्री पीस रु.१००० पासून पुढे
* जेन्टसचे ब्रॅण्डेड शर्ट, टी-शर्ट 6XL पर्यंत तसेच फॉर्मल पॅण्ट व जीन्स ४४ साईजपर्यंत व जम्बो बेडशीट उपलब्ध.

अहिल्यानगर शहरातील भव्य मॉल मयुरी लेडिज मॉल

मल्हार चौक, आयकॉन पब्लिक स्कुल जवळ, आगरकर मळा, अहिल्यानगर ९१०८२०११८८

प्रत्येक रु.१००० च्या खरेदीवर एक लकी ड्रॉ कुपन..



अहिल्यानगर

शॉप नं. २५८८, लोकसेवा हॉटेल जवळ, एम्. जी. रोड, कापडबाजार. ☎ ०२४१-२९९१६६०

शॉप नं. १ ते ३, ग्राऊंड फ्लोअर, माऊली संकुल, झोपडी कॅन्टीन जवळ, सावेडी. ☎ ०२४१-३३५३०९२

॥ २० वे पुण्यस्मरण ॥



कै. सुभाष (आबा) माधवराव गाडे

स्व. दि. ६/११/२००६

सुसंस्कार ... सुविचारांचा वारसा
आमच्या पाठीशी आहे...
स्मृती सुगंध आपल्याच आदर्शत्वाचा
आजही दरवळत आहे...

आपल्या पावन स्मृतीस भावपूर्ण श्रध्दांजली

* दु:खांकित *

प्रा.शशिकांत गाडे । रमाकांत गाडे
श्रीमती सुनिता सुभाष गाडे । आशाताई भाऊसाहेब माने
विजूताई दशरथ कराळे । मंजुषाताई उदय मिस्कीन । दिपालीताई अभिजीत येवले
जागृतीताई हर्षद नरसाळे । प्रांजलीताई केतन लामखडे
ज्योतीताई वैभव घालमे । संभाजी सुभाष गाडे । शंतनु सुभाष गाडे

समस्त गाडे परिवार

हॉटेल यशांजली महेश टॉकिज जवळ | हॉटेल यशपॅलेस नगर-पुणे रोड | हॉटेल यशग्रँड कायनेटीक चौक | गाडे ट्रान्सपोर्ट कायनेटीक चौक

I have fought the good fight, I have finished the race
I have kept the faith- 2 Timothy 4:7

IN LOVING MEMORY OF



SAMUEL RATHOD

First Death Anniversary
07 November, 2026
A Tribute of Love and Remembrance

In Loving Tribute By: Rathod Family, Pandit Family, Kedari Family, Amolik Family, Robert Family, Bhalekar Family

द्वितीय पुण्यस्मरण



चंदनापरी झिजून तुम्ही... मिळवून दिला आम्हा मान...
तुमच्या कार्याला, तुमच्या स्मृतीला आमचा शतशः प्रणाम !

आपल्या पावन स्मृतीस भावपूर्ण श्रध्दाजंली

* दु:खांकित *

डॉ. रवींद्र कवडे, प्रो. सुरेंद्र कवडे, गजेंद्र कवडे, न्यायाधीश योगेंद्र कवडे, महेंद्र कवडे, अभिनंदन वाळके, थोरात, पवार, कापसे, गोधडे, वाळके, दांगट, मुळे,तरोटे व मित्र परिवार

स्व.देवेंद्र रभाजीराव कवडे (सर)

जन्म- दि. ०९/०६/१९४८ मृत्यु- दि. ०६/११/२०२४